म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. ७४२

अशी ही वीररमणी

BVBK-0400142

बा. वा.
नों. क्र. १४२

म. ग्रं. सं, ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
नों. क्र. १४२ दिनांक ......
विभाग किशोर क्र. १२९

# अशी ही वीररमणी

## (अर्थात् राणी दुर्गावती)

: लेखक :

दिवाकर बापट

●●●

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क. .... दिनांक .......
विषय .... क्र. . 929.

BVBK-0400142

किमत तीन रुपये

प्रकाशिका

सौ. निर्मला नारायण अरगडे

अरगडे कुलकर्णी प्रकाशन,

१६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०.

द्वितीयावृत्ती, १९७२

: प्राप्तीस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०.

सौ. मालिनी कुलकर्णी
बद्रिकाश्रम, १ ली खेतवाडी,
अलंकार सिनेमाजवळ, मुंबई ४

सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन

: मुद्रक :

सौ. वसुधा रघुनाथ खरे

अक्षर मुद्रणालय,

४७, इंडस्ट्रियल ईस्टेट,

लोणावळा (जि. पुणे)

# अभिप्राय

कुमार-मालेतील पाच ऐतिहासिक कादंबरिका वाचल्या. या पाच कादंबरिकांपैकी ‘दुःखिता’ व ‘भयचकित नमावे तुज रमणी’ यामध्ये देवी अहिल्याबाईंच्या पुण्यश्लोक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविलेले आहे; ‘कहाणी एका राणीची’ व ‘अशी घेतली झुंज’ यांमध्ये रामगढची प्रजाहितदक्ष व पराक्रमी राणी अवंतीदेवी हिची हृदयस्पर्शी कहाणी निवेदलेली आहे आणि ‘राणी दुर्गावती’ मध्ये मोंगलांना धूळ चारणाऱ्या एका तेजस्वी वीररमणीची गौरवमय गाथा गायिलेली आहे.

कुमार-वय हे अद्‌भुताविषयी स्वभावतःच जिव्हाळा बाळगणारे, भूतकालातील अद्‌भुतरम्य घटनांविषयी ओढ बाळगणारे असते. कुमार-मनाचीही स्वाभाविक भूक भागवताना लेखकाने या पाच कादं-बरिकांच्या द्वारा भारतीय स्त्रियांच्या विशुद्ध शीलाचे, त्यागमयतेचे निग्रह शक्तीचे आणि प्रसंगी प्राण पणास लावून दुष्ट शक्तीचा विरोध करण्याच्या सिद्धतेचे जे वेधक दर्शन घडविले आहे, त्यामुळे रंजनाबरोबरच कुमार-मनावर उदात्त संस्कार निःसंशय घडू शकतील. आजच्या दिशाहीन कुमार-जीवनात अशा प्रकारच्या संस्कारांची नितांत गरज आहे आणि संस्कार हे रंजकतेने घडविले तर ते सहजी मनी भुरण्याची शक्यता आहे. या दृष्टीने मला या उपक्रमाचे विशेष महत्त्व वाटते.

या पाचही कादंबरिकांची कथनशैली वेधक आहे कुमार-वाचक या कादबरिकांचे मनापासून स्वागत करतील हे निःसंशय. या आकर्षक प्रकाशनाबद्दल प्रकाशक व लेखक यांस हार्दिक धन्यवाद !

‘लोककल्याण’
७७ शनिवार पेठ, पुणे ९
१४–५–१९७१

रामचंद्र चिंतामण ढेरे

## म. म. द. वा. पोतदार यांचा अभिप्राय

" या कथा मी वाचल्या. चटकदार वाटल्या. वाचकाला गोडी लावतील. अरगडे-कुलकर्णी प्रकाशनचा उपक्रम स्तुत्य आहे. "

## प्रकाशकीय

किशोरांसाठी विविध मनोरंजक व उद्बोधक पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंन्त प्रकाशित झालेली पुस्तके किशोरांना फारच आवडली.

संस्कारक्षम पुस्तके किशोर मित्रांना खासच आवडतील. संस्कारक्षम बाल-मनावर मनोरंजनाद्वारे संस्कार म्हणजेच उत्तम पुस्तके. त्यासाठीच प्रत्येकाने आमची प्रकाशने संग्रही ठेवावीत.

# राणी दुर्गावती

## प्रकरण : १

शेरशहाचे देहावसान झाले तेव्हाची गोष्ट !

हुमायून त्या वेळी सतत बाहेर असावयाचा. इकडल्या-तिकडल्या स्वाऱ्या-शिकाऱ्यात त्याचा जीव सारखा गुरफटलेला असावयाचा. उत्तर भारतात आपला जम बसावा म्हणून शेरशहाचा मुलगा सलीमशहा आपल्या जीवाचे रान करीत होता. त्यापायी त्याने आपल्या स्वतःच्याच कित्येक सरदारांना यमसदनाला पाठविले होते. अन् तरीही त्याचा बेत धडपणे तडीस जात नव्हता. बंगाल-बिहारँकडे वस्ती करून राहिलेले पठाण दोनशे वर्षे झाली; आपले स्वातंत्र उपभोगीत होते. माळवा अन् गुजराथने आपला स्वतःचा वेगळा कारभार कधीपासूनच चालू केला होता. गोंडवनच्या दुर्गावतीने स्वतःच्या गोंड राज्याचा कारभार पाहावयाला लागून आता उणीपुरी सहा वर्षे झाली होती.

सलीमशहाही देवाघरी गेला अन् त्याच्यामागून त्याचा मुलगा फिरोजखान गादीवर आला. पण बिचारा कमनशिबी! त्याच्या मामानेच त्याच्यावर हत्यार चालविले. मामाचे नाव होते मुबारकखान. पण बादशहा बनताच त्याने आपले नवे नाव जाहीर केले. 'महंमदशहा आदिल.' खरे तर सारेच त्याच्या उल्लेख करताना 'आदिल' न करता 'अदाली' असाच करीत. महंमदशहा काहीसा तिरसट अन् पुष्कळसा आळशी होता; पण त्याचे विलासी शोक जबरदस्त होते. 'बादशहा' म्हणून स्वतःला जाहीर करताच त्याने आपली राजधानी चुनारला हलविली.

पण गंमत अशी होती की, आळशी अन् नालायक महंमदशहा राज्यकारभाराकडे मुळीच लक्ष देत नव्हता. फार काय त्याला ते धड जमत देखील नव्हते. राज्यकारभार पाही एक हिंदू सरदार. त्याचे नाव होते हेमू. मेवाडातील रेवाडी नगरचा हा रहिवाशी. मोठा हुशार अन् प्रतिभावंत होता तो. चांगले चांगले गुण जन्मतःच त्याला घट्ट चिकटले होते. आपल्या एकंदर राज्याची नि तिथल्या एकूण अर्थव्यवहाराची त्याला अचूक माहिती होती, एक शूर सैनिक अन् कुशल सेनानायक म्हणूनही त्याने आपले नाव उजळले होते. अनेक लहान मोठ्या युद्धात त्याने आतापर्यंत कितीकदा बाजी मारली होती. हातात भरपूर पैसा; कसलेली सेना दिमतीला, निरनिराळ्या जमातींची श्रद्धा असलेला तो सेनाप्रमुख साऱ्यांच्या कौतुकाचा विषय बनून राहिला होता!

हुमायून परत हिंदुस्थानात आला तेव्हा हेमूने स्वतःला 'सम्राट' म्हणवून घेण्यास सुरुवातही केली होती. त्याने आपले नवे नाव 'विक्रमादित्य' कागदोपत्री लावावयास सुरुवातही केली होती. ह्याच सुमारास शिकंदर पंजाबमध्ये ठाण मांडून बसला होता. ह्याच शिकंदराचा ह्यापूर्वी हुमायुनाने एकदाच पण सणसणीत पराभव केला होता. अन् तो त्यावेळी पंजाबमधल्या डोंगरकपाऱ्याकडे पळून गेला होता. हुमायुन परत आला तेव्हा हेमू आग्ऱ्याजवळील एका छोट्याशा लढाईत गुंतला होता.

सुयोग्य संधीची वाट पाहून हुमायुनने दिल्लीवर आपला ताबा मिळविला स्वतःला 'बादशहा' म्हणून घेऊन तो निर्भयही झाला. पण तोही बिचारा दुर्दैवी ठरला. एका भव्य इमारतीचा जिना उतरत असताना पाय घसरल्याचे निमित्त होऊन तो गडगडत खाली आला अन् त्याच अपघाताने त्याचा बळीही घेतला.

हे सारे घडत असताना अकबर दिल्लीतच होता. साहजिकच हुमायुनाच्या अवसानानंतर त्याचे 'सम्राट' म्हणून नाव घोषित झाले. अकबराचे वय ह्यावेळी उणे पुरे चौदा वर्षांचेही नव्हते. इतक्या लहान वयात राज्याची जबाबदारी पार पाडण्याचा प्रसंग गोंडवनच्या नारायणसिंह ह्याच्यावरच आला होता. अन् तोही अवघा अकरा वर्षांचा असताना!

अकबर लहान असल्यामुळे त्याचा जवळचा एक नातेवाईक बैरामखानच सारा कारभार पाहात होता. हुमायुनाच्या वेळेपासून शाही नोकरीत असलेला सरदार तार्दीबेग बैरामखानाला हरघडी मदत करीत होता. तार्दीबेगला त्यासाठी पाच हजाराची मन्सब मिळत होती.

हेमूचा जागजागी पराभव करून बैरामखानाने आपला मार्ग निष्कंटक केला. राज्याची व्यवस्था उत्तम लावली अन् ह्याच काळात दिल्ली सल्तनतीचे उरले सुरले शत्रूही निपटून काढिले. साहजिकच वयात येऊन राज्यकारभार पाहू लागताना अकबराचा त्रास चुकला होता. व्यवस्था पाहावयास बैरामखानासारखा समर्थ माणूस मागे असल्यामुळे परिणाम एकच झाला होता. अकबर आपला बराचसा वेळ जंगली जनावरांच्या शिकारी करण्यात घालवू लागला.

एक दिवस असाच शिकारीवर गेला असताना त्यानें एक भला मोठा जंगली वाघ मारून आणला. चांगली शिकार मिळाली म्हणून त्याचे मन आनंदाने बेहोष झाले. तो आनंद द्विगुणित करण्यासाठीच की काय, त्याने त्या दिवशी थोडीशी दारूही घेतली होती. अकबर असा आनंदमग्न असतानाच पहारेकऱ्याने बाहेर कुणा साधूंची एक टोळी बादशहांच्या दर्शनाला आली असल्याची

वर्दी दिली. त्या साधूंच्या टोळीजवळ पंधरा हत्ती असल्याचे अन् त्यांच्या नायकाचे नाव गोपानंद असल्याचेही पहारेकऱ्याने त्याला निवेदन केले होते. अकबराने त्या टोळीच्या नायकाला भेटीला पाठवून देण्याची सूचना देताच पहारेकरी सलाम करून बाहेर पडला.

अन् काही क्षणातच अकबरासमोर एक जटाजूटधारी बैरागी येऊन उभा राहिला. त्याच्या लांब दाढीकडे; रेशमी कफनीकडे अन् गळ्यातील रुद्राक्षांच्या नि सोन्यांच्या मण्यांच्या माळेकडे



अकबर कितीतरी वेळ नुसता पाहातच राहिला. आत आल्या आल्या गोपानंदने अकबराकडे एकदा पाहिले अन् नित्याचे रीतीरिवाज पाळून त्याने बातचीत करावयास सुरुवात केली. अकबर त्याच्याशी

हिंदीतूनच बोलू लागला. गोपानंदाला त्याने नाव तर विचारलेच. पण त्याच्या जमातीबद्दल अन् टोळीबद्दलही माहिती ऐकण्याची त्याने इच्छा प्रगट केली.

विनयपूर्वक त्या साधूने सारी माहिती दिली.

'दिल्लीश्वरा, माझे नाव गोपानंद. मी एक बडा जमीनदार होतो. पण मन विरक्त झाले तेव्हा संन्यास घेऊन मोकळा झालो. फिरता फिरता गोंडवनच्या जंगलात शिरलो. तिथल्या गौर नदी-काठी काही गुहा दिसल्या अशाच एका गुहेत मला एक योगी भेटला. त्याचे वय काय होते, कुणास ठाऊक ! पण मी चटकन् त्यांचा शिष्य बनलो.'

'गौर नदी इथून किती दूर आहे ? अन् तो साधू अजून हयात आहे ?'

अकबराने आपले कुतूहल प्रगट केले.

'होय सरकार. ते अमर आहेत पण....'

'पण काय ?'

'पण सध्या ते हिमालयात निघून गेले आहेत.'

गोपानंद बोलता बोलता क्षणभर थांबला अन् मग मधेच काहीसे आठवल्यासारखे करीत त्यानें म्हटले, 'हुजूर, गौर नदी इथून चांगली दोनशे कोसांवर आहे.'

'ठीक ठीक. पण काय हो साधुमहाराज, गौर नदीच्या काठ-च्या जंगलात वाघ-बिघ आहेत की नाहीत ?'

अकबरानें चौकशी केली.

'हुजूर, त्याला काही नाही. शिवाय हत्तीही आहेत तिथे. अगदी पांढरे हत्तीदेखील.'

गोपानंदने आपल्याजवळची माहिती दिली.

'अरे वा! मग एकदा गेले पाहिजे आम्हाला तिकडे.'

अकबर खूष झालेला दिसला. गोपानंद ती खुषी पाहून चांगलाच धीट बनला. आपल्या आगमनाचे कारण आताच सांगण्यात मौज आहे असे त्याच्या मनात आले.

'दिल्लीश्वरा, योगाच्या अनेक क्रिया मला अवगत आहेत. अन् माझ्या टोळीत माझे शिष्यही खूप आहेत.'

'ठीक आहे. आम्ही त्यांच्या खान्याचा बंदोबस्त करू. पण त्याआधी आम्हाला गोंडवनाकडली हकीकत ऐकावयाची इच्छा आहे. आम्ही गेले काही दिवस ऐकतो आहो की, एक सुंदर औरत तिथे राज्यकारभार चालविते आहे म्हणून.'

'होय खाविंद. खरे आहे ते. पण ही औरत आहे फार घमेंडखोर. वाघाची शिकार करते तेव्हा तिला वाटते की, शिकरीत बरोबरी करणारा इथे कुणी नाही !'

अकबर काही क्षण विचार करीत राहिला.

'हो. हो. आठवले. साधुमहाराज, ह्या औरतचे नाव दुर्गावती का असेच काही तरी आहे नाही का ?'

'होय, हुजूर. दुर्गावतीच तिचे नाव.'

'फौज किती आहे तिच्याजवळ ?'

'चाळीस-पन्नास हजार पायदळ नि पंधरा एक हजार घोडदळ असेल हुजूर. अन् त्याशिवाय हत्ती........'

'हं. हं. हत्ती किती आहेत ? अन् कसे आहेत?'

अकबराची उत्सुकता कमालीची वाढली होती.

'खाविंद, हत्ती असतील की चांगले सात-आठशे.'

'असे नको, साधुजी नक्की आकडा सांगा.'

'खाविंद, नक्की बातमी काढून सांगतो. हे पण मात्र खरे की,

सारे हत्ती लढाईसाठीच आहेत. खूप शिकवून तयार केलेत त्यांना. हुजूर, त्यापैकी एक तर मी माझ्या डोळ्यांनी पाहिलाय. अगदी संगमरवरासारखा सफेद आहे तो.'

'हो. ऐकलेय् खरे. तिकडल्या जंगलातून सफेद हत्ती सापडतात म्हणतात.'

'होय, हुजूर. पण फारच थोडे !'

'साधुजी, ह्या दुर्गावतीच्या सैन्यात फक्त गोंड लोकच आहेत की, आणखीही दुसरे कुणी आहे ?'

'खाविंद, गोंडाचाच अधिक भरणा आहे तिच्या सैन्यात. तसे रजपूत आहेत नि पठाणही आहेत थोडेफार. नाहीत असे नाही!'

'पठाणही आहेत ?'

'हं!'

बादशहा अकबर क्षणभर विचारात पडला.

'गोंड प्रकृतीने कसे असतात ?'

'शरीराने ठेंगणे, पण स्वभावाने विचित्र गोष्टीवर विश्वास ठेविणारे असतात हे लोक. खाविंद, गायींना ते नांगराला जुंपतात. सात देवतांवर त्यांची श्रद्धा असते.'

साधू हसत हसत सारी माहिती देत होता नि अकबर क्षणाक्षणा विस्फारलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहात होता. त्याच्या मनात आले– 'काय विचित्र माणूस आहे हा ! स्वतःच्या लोकांची स्वतःच्याच तोंडाने बदनामी करतो आहे.'

खूप वेळ कसला तरी विचार करून झाल्यावर बादशहाने हलकेच नजर वर करून साधूकडे पाहिले. विजयी मुद्रेने अजूनही हसत हसत तो उभा होता.

'साधुजी–'

अकबराने त्याला हाक मारली.

'जी हुजूर.'

'आपले घरदार कुठे आहे; ते आपण आम्हाला अजून सांगितले नाहीत? आपली जमिनदारी .....'

बादशहा अकबराचा प्रश्न पुरा होण्यापूर्वीच साधू गोपानंदाने उत्तर दिले.

'सरकार, माझे घरदार, जमिनदारी सारे काही मेवाडमधल्या रेवाडी क्षेत्रात आहे.'

साधू गोपानंदाने दिलेली ती माहिती ऐकता ऐकता बादशहा अकबराला एकदम हेमूची आठवण आली. स्वतःला 'विक्रमादित्य' म्हणवून घेणारा हेमूही ह्याच भागातला आहे, हे अकबराला चांगले ठाऊक होते. त्याच्या जवळदेखील शिकवून तयार केलेले पंधरा हत्ती आहेत अन् तो त्याच्या भागातील एक वजनदार असामी आहे, ह्याची नोंद ह्यापूर्वीच त्याच्या मनाने केली होती. एका क्षणात त्याच्या मनापुढून ही माहिती पुन्हा एकदा उलगडून पुढे सरकली.

'ह्या गोंडांनीच बाजबहाद्दराचा पराभव केला ना?'

अकबराने कुतुहलाने विचारले.

'गोंडांनी कुठले हरवले, सरकार!. बाजबहाद्दर हरला त्याच्या दुर्दैवामुळे. त्यानंतरही खूप लढाया तो लढला अन् प्रत्येक लढाईत तो चांगलाच पराभूत होत गेला.'

साधू गोपानंद बोलता बोलता क्षणभर थांबला. त्याने एक दीर्घ सुस्कारा सोडला.

'खाविंद, बाजबहाद्दराचे हे दुर्भाग्यच म्हणायचे. दुसरे काय?'

बादशहा अकबर काही बोलला नाही. क्षण दोन क्षण नुसताच तो साधू गोपानंदाकडे पाहात राहिला.

'निशाणबाजी करण्यात ही दुर्गावती मोठी बाकबगार आहे, असे ऐकतो. खरे का हे ?'

शांतपणे एक एक शब्द उच्चारीत अकबराने प्रश्न केला.

'खाविंद, नेमबाज आहे, हे ठीक आहे. पण आपल्यापुढे तिचा काय पाड लागणार! होय की, नाही?'

साधू गोपानंदाने बादशहाची स्तुती गायिली.

अकबर त्या प्रशस्तीपत्राने अन् स्तुतीने चांगलाच सुखावून गेला.

'हं, साधुजी.'

नकळत त्याने साधू गोपानंदाला उत्तर दिले.

साधूच्या लक्षात आले– बादशहा हळुहळू पण निश्चितपणे आपल्याला अनुकूल होत चालला आहे. आता ह्याच संधीचा आपल्याला ह्वा तसा फायदा उठवावयास हवा. अन् एकदा संधी हुकली की, मग मात्र आपल्याला चांगलेच हळहळत बसावे लागेल. पश्चात्ताप करावा लागेल !

साधू गोपानंदाने मनाचा हिय्या करून बाहशहाकडे पाहिले. शांतपणे बादशहा आपल्या आसनावर बसून होता.

'सरकार, माझे नाव महंत गोपानंद.'

'ठीक. ठीक. महंतजी, एक सांगा. तुम्हाला हे पंधरा हत्ती कुठून मिळाले ?'

'खाविंद, ह्या गोंडवनात असे कितीक राजे-महाराजे आहेत की, जे आमच्या चरणांची नित्यश: पूजा करतात. त्यांच्यापैकीच काहींनी हे हत्ती आम्हाला दिले. अन् हत्ती नजर करण्यात त्यांना गैरही काही वाटत नाही. एकूण गोंडवनात हत्तीच खूप. छोट्याशा जंगलातदेखील शंभर शंभर हत्तीं सापडतील.'

'अरे वा ! बघितले पाहिजे एकदा तिकडे जाऊन.' अकबराने उत्कंठेने म्हटले. 'महंतजी, तुम्ही वरचेवर त्या भागात जात असणार नाही का ?'

'जी, खाविंद ! '

'मग तुम्हाला तिकडली खडान् खडा माहिती असणार? सारा गोंडवन तुम्ही पायांखाली घातला असणार ?'

बादशहा अकबराचा स्वर काहीसा उंचावला होता. डोळ्यांत एक निराळाच भाव झगझगत होता. साधू गोपानंदाच्या मनाला ह्या फरकाचा ओझरता स्पर्श झाला. अन् चांगलाच दचकला तो त्या जाणीवेने.

'खाविंद, खोटे कशाला सांगू ! पण गोंडवनाचा साराच मुलूख काही मी पालथा घातला नाही.'

अकबराने स्थिर नजरेने त्याच्याकडे पाहिले अन् स्वतःशी कसलातरी अंदाज बांधला.

'साधुजी, तुम्ही आमचे एखादे काम करू शकाल ?'

बादशहा अकबराने सरळ प्रश्न विचारला.

'हुजूर, आपल्या सेवेला आम्ही हजर आहोत. आपण फक्त हुकूम सोडावा. बस्स ! '

'हे पाहा, साधुजी, सध्या आम्ही उत्तरेकडल्या कारवायात गुंतलो आहोत. ह्यातून मोकळे व्हायला तसा आम्हाला फारसा वेळ लागणार नाही. पण तरीही आम्हाला सारी निरवानीरव करावयास काही अवधी खास लागेल. एवढ्या वेळात तुम्ही गोंडवनातील सारी खडा न् खडा माहिती काढा. आम्हाला सत्य हकीकत समजून घेण्याची फार फार इच्छा आहे. त्या राणीकडे पायदळ किती, घोडदळ किती, हत्ती किती, दुर्गावतीची लढाईची

कितपत तयारी आहे, तिकडले किती अन् कोणकोणते राजेमहाराजे ह्या मोहिमेत आम्हाला साथ करतील, हे आम्हाला सारे सारे विस्ताराने कळावयास हवे. म्हणजे इकडे येताच आमचा पवित्रा आम्ही टाकू. गोंडवनावर हल्ला करणे, तेव्हाच शक्य होणार आहे. आम्ही इथे असताना, एक स्त्री तिथे राज्य करते; हे आम्हाला सहन होण्यासारखे नाही. समजलात ?'

एका दमात बादशहा अकबराने आपले मन उघडे केले. साधू ती योजना ऐकता ऐकता चांगलाच दचकला. त्याचे सारे अंग शहारले.

'जी, खाविंद, आले ध्यानात. मी करतो सारी व्यवस्था. तिथले काही राजे–महाराजे माझ्या चांगल्याच परिचयाचे आहेत. राणी दुर्गावतीचें वर्चस्व त्यांना मंजूर नाही, हे मला पक्के ठाऊक आहे. त्यांना आपल्या चरणाशी घेऊन येण्याची कामगिरी माझ्याकडे लागली.'

'ठीक आहे. ह्याबाबत आम्हाला योग्य ती साथ केलीत; तर मग आम्हीही तुमच्या पाठीशी आहोत. आम्ही तुमच्या कामगिरीचे योग्य चीज करू अन् तुम्हाला एकादी जहागिरीही देऊ.'

'खाविंद, पण ती कुठे ?'

साधू गोपानंदाच्या तोंडाला पाणी सुटले.

बादशहा अकबर क्षणभर विचार करीत राहिला. त्याने दातानी आपला ओठ किंचित दाबला.

'बिहारच्या एका इलाख्यात तुम्हाला चांगली पाच लाख रुपायांची...नाही....नाही ; चांगली पन्नास लाखाची जहागिरी देऊ.'

खरे तर बिहार काय किंवा बिहारचा कुठलाही भाग त्या वेळी अकबर बादशहाच्या ताब्यात नव्हता. तिथे होते एका पठाण सुभेदाराचे राज्य अन् नुकतेच त्याने अकबराविरुद्ध डोके वर काढिले होते. साधू गोपानंदाला ह्यापैकी काहीच ठाऊक नव्हते. अकबरानेही मागचा पुढला काहीच विचार न करता बिहारमधली जहागिरी देण्याचे गफलतीने कबूल करून टाकिले. साधू गोपानंदाचा, त्या घोषणेमुळे झालेला आनंद, गगनात मावत नव्हता. झटकन पुढे होऊन त्याने वाकविता येईल इतके आपले मस्तक बादशहापुढे वाकविले अन् त्याला नमस्कार केला.

'खाविंद, आपली सेवा करण्यात माझ्या हातून जरासुद्धा कसूर होणार नाही बघा. आपण आमच्या धर्माचे रक्षण करण्याचा विडा उचलला आहे. त्या आपल्या कार्यात आम्हीही आघाडीवर राहू. मग असे करीत असताना भले आम्हाला आमचे प्राण गमवावे लागले तरी बेहेत्तर! गोंडवनमध्ये नांगराला गाई जुंपतात, हे नाही तरी आम्हाला बघवत नाही. ह्यात फरक पडलाच पाहिजे. किती दिवस सहन करावयाचे हे?'

कळवळून बोलावे तसे साधू गोपाचंद बोलत होता. बादशहाला आनंद झाला. त्याने आग्रहपूर्वक त्याला व त्याच्या साथीदारांना भोजनासाठी ठेवून घेतले.

भोजनसमारंभ संपला नि मधेच बादशहा अकबराने साधू गोपानंदाला म्हटले, 'साधुजी, आम्ही दुर्गावतीच्या नावे एक फरमान काढू. त्यात तिला आम्ही सुचवू की, तुमचा तिने योग्य तो आदर राखावा. अन् तिने आमचा हुकूम मानून आपल्याजवळ असलेला तो पांढरा हत्ती आम्हाला नजर करावा. ह्या दोन गोष्टीशिवाय आम्हाला सुचतील अन् योग्य वाटतील त्या योग्य सूचना अन हुकूम

आम्ही ह्या फरमानात घालू.'

'ठीक आहे, हुजूर. मग घेऊ आम्ही आपली रजा?'

साधू गोपानंदने जाण्यासाठी बादशहाकडे अनुज्ञा मागितली.

'हं. पण त्यापूर्वी....'

बादशहा किंचित घुटमळला.

'त्यापूर्वी काय, खाविंद?'

साधू गोपानंदाच्या डोळ्यांत कुतूहल जमा झाले.

'त्यापूर्वी आपण आपल्याजवळचे काही हत्ती आम्हाला दिले पाहिजेत.' बादशहाने आपली मागणी पुढे केली.

साधू गोपानंदाला तरी काय; तेच हवे!

त्याने चटकन् म्हटले, 'काही का? सारेच घ्या की, हुजूर. त्यात अनमान का करावे आपण? नाहीतरी आम्ही सारे आपलेच आहोत की!'

बादशहा अकबर प्रसन्नपणे हसला.

'महंतजी. सारेच हत्ती आम्हाला काय करायचेत? फक्त पाचच द्या अन् त्यांची किंमतही आमच्याकडून मोजून घ्या.'

–महंत गोपानंदाने आपल्याजवळचे पाच उत्कृष्ट हत्ती बादशहाला विकून टाकिले अन् एके दिवशी त्याने बादशहाची रजा घेतली.

साधू गोपानंदाने आता आपली पावलें गोंडवनाकडे वळविली.

● ●

## प्रकरण : २

गोंडवनाकडे निघालेला साधू गोपानंद एकटाच नव्हता. बादशहा अकबराने आपल्या सैन्याची एक छोटीशी तुकडी त्याच्याबरोबर गोंडवनाकडे धाडली होती. महंताचा कुठलाही हुकूम पाळण्याची सूचना त्या तुकडीला मिळाली होती. म्हणजेच ती तुकडी गोपानंदाच्या पूर्णपणे ताब्यात होती. ही तुकडीबरोबर घेऊन गोंडवनला पोहोचावयास साधू गोपानंदाला काहीसा उशीरच झाला. दुर्गावती त्यावेळी चौरागडला होती म्हणूनच की काय, त्याने आपला मुक्काम सिंगोरगडपासून थोड्या अंतरावर ठोकला. अन् एका दूताकरवी तिथूनच त्याने राणी दुर्गावतीला निरोप पाठविला– 'काही महत्त्वाच्या गोष्टी बोलावयाच्या आहेत. म्हणून दिल्लीचा बादशहा अकबराने मला इथे पाठविले आहे. तेव्हा भेट घ्यावी.'

बादशहा अकबराने फरमानाच्या स्वरूपातील केलेल्या इतर सूचना मात्र त्याने कळवावयाच्या कटाक्षाने टाळल्या.

महंत गोपानंदाने पाठविलेल्या निरोपावर राणी दुर्गावती अन् तिच्या सहकाऱ्यात कडाक्याची चर्चा झाली. बादशहा अकबराने आजवर मारलेल्या लढाया अन् त्यात मिळविलेला विजय ह्यासंबंधीच्या तपशीलवार हकीकती ह्यापूर्वीच त्यांच्या कानांवर येऊन पोहोचल्या होत्या. 'आता त्याच बादशहाच्या वतीने त्याचा संदेश घेऊन कुणी साधुमहात्मा आला आहे. येऊ दे त्याला. आमच्या वतीने आधारसिंह त्यांच्याशी बोलणी करतील. बघू काय होते त्यात!' असा निर्णय ह्या बैठकीत घेण्यात आला.

अन् बैठकीत ठरल्याप्रमाणे साधू गोपानंदाच्या भेटीला म्हणून आधारसिंह निघाला. बरोबर हत्ती होते. थोडे साथीदारही होते.

सारी मंडळी कशी त्यागी-तपस्वी दिसत होती.

महंत गोपानंदाची भेट होताच आधारसिंहाने त्याला मोठ्या विनयाने वाकून नमस्कार केला.



महंताने म्हटले, 'महाराणी दुर्गावतीने एकदाच नव्हे तर हजार वेळा बाजबहाद्दराचा पराभव केला, ह्या गोष्टीचे दिल्लीपती अकबर बादशहांना मोठे कौतुक वाटते. अन् म्हणूनच त्यांनी पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितले आहे की, जेव्हा जेव्हा जरूर लागेल तेव्हा तेव्हा न संकोचता बादशहाकडून आपण सैन्याची मदत मागवावी. आपला शब्द येण्याचा अवकाश, दिल्लीहून सैन्य निघालेच म्हणून समजा.'

शिष्टाचार म्हणून आधारसिंह फक्त हसला.

'महंतजी, आपली अन् बादशहांची आमच्यावर कृपादृष्टी आहे. मग आणखी काय पाहिजे? तसे पाहिले तर आमच्या महाराणींची शक्ती काही कमी नाही. माळवा-मांडूशी एकट्याने सामना करावयास त्या केव्हाही तयार आहेत. पण त्यांची दृष्टी आहे केवळ आपल्याच गोंडवनावर. त्याचे भले कसे होईल, ह्याचीच महाराणींना सारखी चिंता लागून राहिलेली असते. त्यांना शक्य असले तरी दुसऱ्यांचा मुलूख बळकावून किंवा घशात घालून काय करायचे आहे?'

आधारसिंहाने खुलासा केला.

'आधारसिंह, महाराणींना दुसऱ्यांच्या मुलुखाचा लोभ नाही, हे बादशहांना पण चांगले ठाऊक आहे. तरीही त्यांनी जे कळविले आहे; त्याला असे ठोकरून चालणार नाही. कुणी सांगावे, कधी काय वेळ येईल ते! आपण आपले सावध असावे.'

महंत गोपानंदाने गोड आवाजात सुचविले.

'तुमचेही म्हणणे ठीक आहे, महंतजी. आम्ही बादशहांच्या ह्या शुभेच्छेचे स्वागत करतो. पण....'

'पण काय ?'

साधू गोपानंदाने कान टवकारले.

'पण तुमच्या दिल्लीपती बादशहाने आमच्यासाठी काही लेखी फरमान सोडले आहे का ?'

आधारसिंहाने जरा दबकतच चौकशी केली.

'नाही बुवा. तसे लेखी-बिखी काही आणले नाही. बादशहांचे मुत्सुद्दी येऊन ते काम करतीलच. पण त्याचे काय झाले आम्ही मथुरा-वृंदावनच्या यात्रेला निघालो होतो. वाटेत आमची बादशहांशी गाठ पडली. ते देखील ह्या वयात चांगलेच ईश्वरभक्त व

विराो२ क्र. ९२९

आम्हाला म्हणून त्यांच्याशी वार्ता केली नि तीर्थयात्रेकरूंवर लादला जाणारा कर आम्ही त्यांच्याकडून माफ करवून घेतला. आमच्या संगतीत बादशहा काही दिवस राहिलेदेखील आमचा सत्कार केला त्यांनी अन् जेव्हा त्यांना कळले की, आम्ही नर्मदेकडल्या यात्रेला जाणार आहोत. तेव्हा त्यांनी मुद्दाम आमच्याबरोबर हा निरोप दिला. मुत्सुद्दी रीतसर फरमान घेऊन येतीलच. शिकारीच्या नादात आजकाल बादशहा गुरफटले असले तरी राजकारणात पाळावयाच्या असल्या नियमांना ते विसरणार नाहीत.'

महंत गोपानंदाने सविस्तर खुलासा केला. त्याचे बोलणे व्यवस्थित अन् सहज सहज असल्यामुळे आधारसिंहाचा चटकन् त्यावर विश्वास बसला. महंताचा निरोप घेऊन त्याने चौरगडाकडे प्रयाण केले नि महंताबरोबर झालेले सारे संभाषण त्याने महाराणी दुर्गावतीला ऐकविले. महाराणीचाही चटकन् त्यावर विश्वास बसला तिने मोठ्या सन्मानाने महंत गोपानंदाला गडावर येण्याचे आमंत्रण दिले. आमंत्रणानुसार महंताने गडावर पायही ठेविला अन् मोठ्या प्रेमाने त्याने महाराणी दुर्गावतीच्या पुत्राला वीर नारायणाल–एक भेटही सादर केली पंधरा वर्षांच्या नारायणाविषयी त्याला अपार प्रेम वाटू लागले असल्याचे त्याने दाखविले. त्याच्या मोकळ्या वागण्याने महाराणीला अतिशय आनंद झाला. अन् त्या आनंदाच्या भरातच जेव्हा महंताने अनेक स्थळे पाहाण्याची इच्छा प्रगट केली. तेव्हा तिने कसलेही आढेवेढे न घेता चटकन् त्याला हवी होती ती परवानगी देऊन टाकली. ही स्थळे पाहाताना कुणीतरीं सोबतीला हवा म्हणून महाराणीने आधारसिंहालाच त्याच्याबरोबर दिले. आधारसिंहाने त्याला नुकतीच स्थळे दाखविली नाहीत; तर ठिकठीकाणी त्याचा सत्कारही घडवून आणला.

ह्या धामधुमीत काही महिने उलटले अन् आपली यात्रा संपवून महंत गोपानंद एक दिवशी आपल्या उत्तरेकडल्या यात्रेसाठी निघून गेला. जाताना त्याची स्वारी भलतीच खूषीत होती.

निघण्यापूर्वी त्याने महाराणी दुर्गावतीची मुद्दाम भेट घेतली अन् म्हटले, 'आता याक्षणी आम्हाला आपल्याकडून कसल्याही प्रकारच्या साहाय्याची अपेक्षा नाही. राणीसरकार, आम्ही आपण केलेल्या आदरसत्करावर खूष आहोत. अशीच आपण आमच्यावर ह्यापुढेही कृपादृष्टी ठेवावी, ही नम्र विनंती.'

महाराणी दुर्गावतीने प्रसन्न मनाने महंताकडे पाहिले, नम्रपणे तो उभा होता. महाराणीच्या आसनाच्या बाजूला उभ्या असलेल्या आधारसिंहाची नजर त्याच्यावर खिळून राहिली होती.

थोडा वेळ कुणीच कुणाशी काही बोलले नाही. सारे कसे शांत शांत वाटू लागले. आधारसिंहाला ही शांतता बोचू लागली. जागच्या जागी आता त्याची चुळबूळ चालू झाली.

का, कुणास ठाऊक ! त्या जीवघेण्या शांततेचा भंग करावा असे आधारसिंहाला राहून राहून वाटू लागले.

'महंतजी, आश्चर्य आहे. अजून बादशहाचे कसलेच लेखी फरमान आले नाही.'

आधारसिंहानी अखेर शांततेचा भंग केलाच.

'काय झालेय कुणास ठाऊक! पण बादशहाकडून कुणी मुत्सद्दी आलेला दिसत नाही खरा'

चेहरा शक्य तितका चिंताग्रस्त करीत महंताने साऱ्या दरबारावरून एकदा नजर फिरविली. सगळ्या दरबारावरदेखिल तशीच काळजीची छाया पडली असल्याचे त्याच्या लक्षात आले.

'बरे. मी असे करतो. उत्तरेच्या यात्रेत दिल्लीला जाईन

तेव्हा बादशहांची भेट घेतो अन् त्यांना लेखी फरमान काढण्याची विनंती करून पाहतो.'

महंताने समजुतीच्या सुरात सांगितले अन् एकदम साऱ्या दरबारावर पसरलेली उदासीनतेची अवकळा दूर झाली!

• •

## प्रकरण : ३

महंत गोपानंद निरोप घेऊन गेला नि त्याच्या पाठोपाठ एक बातमी येऊन ठेपली. बादशहातर्फे राज्यकारभार पाहणारा बैरामखान हाजच्या यात्रेला गेला असताना तिकडेच त्याचा वाटेत खून झाला आहे. बादशहा अकबराने साहजिकच सारी सत्ता आपल्या हातात घेतली असून आता त्याचे लक्ष बिहार-बंगालकडल्या पठाणांकडे लागले आहे. डोके वर काढणाऱ्या ह्या पठाणांशी मुकाबला करण्यासाठी बादशहा जातीनेच तिकडे निघाला असून वाटेत त्याचा मुक्काम माणिकपूरला पडणार आहे.

ही बातमी कानावर येऊन उणापुरा एक महिना उलटला असेल नसेल बादशहा अकबराकडून हवे असलेले फरमान एक दिवस आधारसिंहाच्या हाती पडले. महाराणी दुर्गावतीचा मुक्काम त्या वेळी सिंगोरगडावर होता. अन् म्हणूनच आधारसिंहाने देवाचे नाव घेऊन फरमान वाचून काढिले. अन् आश्चर्याचा केवढा धक्का बसला त्याला! महंताने त्यांना सांगितले होते काय नि प्रत्यक्षात फरमानामधे होते काय? कशाचा म्हणून कशाला मेळ नव्हता. महाराणीला हे फरमान आता कसे नि कधी ऐकवावे, ही एक नवीच चिंता आधारसिंहाला लागून राहिली. तिला त्या फरमानाची

माहिती देणे आवश्यकही होते.

खूप विचार करून आधारसिंहाने कसला तरी निश्चय केला अन् त्याने सिंगारगडची वाट धरली, 'महाराणीच्या कानावर फरमान कसे कसे घालावयाचे,' ह्याचा विचार करण्यात वाट केव्हा सरली तेदेखील आधारसिंहाला कळले नाही.

आल्या आल्या त्याने सिंगारगडावर महाराणी दुर्गावतीची भेट घेतली अन् त्याने तिला फरमानाचे फक्त सारच सांगितले.

अकबराचे फर्मान होते.

'आपण आपल्या जवळचा पांढरा हत्ती आमच्याकडे पाठवून द्यावा. आपण बाईमाणूस राजकाज हे आपले काम नव्हे. आपण केवळ राजमहालात राहून मौज करावयाची. मनात आले तर शिकारीचा खेळ आपण खेळावा. पण राज्यकारभाराशी आपण संबंध ठेवू नये. आपण आपला दिवाण आधारसिंह ह्याला हमी देऊन आमच्याकडे पाठवावे. अन् हे घडले नाही; तर आपला निभाव लागणे कठीणच !'

फरमानाचे सार ऐकता ऐकता महाराणी दुर्गावतीच्या कपाळावर आठ्यांचे जाळे विणले गेले. नाकाचा शेंडा रागाने लालबुंद झाला भरल्या आवाजात बादशहाचे फरमान सुनावण्याचे काम दिवाण आधारसिंह करीत असताना महाराणीचा देह रागाने थरथरू लागला तिने आधारसिंहाकडे पाहिले. त्याचीही अवस्था संतापाने तशीच झाली होती. त्याच्या एकूण अवताराकडे काही वेळ स्थिर नजरेने पाहात ती गप्प उभी राहिली. वीर नारायण गप्प राहून सारे पाहात होता. त्याचे रक्तही तापले होते बराच वेळ त्याची नुसतीच चुळबूळ चालली होती.

'त्या नादान बादशहाची ही हिंमत !'

वीर नारायणाच्याने राहवले नाही. तो चटकन् बोलून गेला. अगदी मनापासून.

महाराणीने एक हलकासा सुस्कारा सोडला. अन् मग म्हटले, 'आम्ही अकबराच्या काय किंवा दुसऱ्या कुणाच्याही राज्यावर कधी हल्ला केला नाही. आक्रमण केले नाही. अन् असे असूनही आज तो आम्हाला आक्रमणाची धमकी देत आहे. ठीक आहे. आम्ही



धर्माच्या नि देशाच्या रक्षणासाठी आमच्या सर्वस्वाची होळी करू. पण ह्या दुष्टाच्या समोर आमच्यातील अगदी गरीबातला गरीब गोंडदेखील मस्तक वाकविणार नाही... सांगण्याची हिंमत तर पाहा .. म्हणे हमी घेऊन तुम्ही तुमच्या दिवाणाला आमच्याकडे पाठनून द्या... त्याला जाऊन सांगा ... स्त्री असूनही तुझ्यासारख्या राज्यकर्त्यापेक्षा मी चांगल्याप्रकारे राज्यकारभार करून दाखवू

शकते ...एका स्त्रीचा अपमान करावयास ह्या दिल्लीपतीला लाज तरी कशी वाटली नाही ...किती हा त्याचा अध:पात ! ...पांढरा हत्ती हवाय् म्हणे ह्याला ..मुळीच मिळणार नाही ...अन् ...अन् हा नकार ह्या नादानाला कळवायला आमचा दिवाणदेखिल जाण्याची काही जरूर नाही.'

सारा दरबार तिचे हे भाषण ऐकता ऐकता थरारून उठला. दिवाण आधारसिंहाने हलके हलके आपले मस्तक वर केले. वीर नारायणाचे दोन्ही बाहू एका नव्या वीरश्रीने फुरफुरू लागले.

महंत अन् फरमान ह्याविषयी दरबारात खूप वेळ उलट-सुलट चर्चा झाली अन् मग सगळ्यांच्या मते फरमानाला एक कडक उत्तर मंजूर करण्यात आले. दिवाण आधारसिंहाने खलित्याचा मसुदा तयार केला अन् बादशहा अकबराचे फरमान घेऊन आलेल्या दलाबरोबरच खलिता रवानाही करण्यात आला.

खलिता घेऊन दल निघून गेले नि मग आधारसिंहानें म्हटले, 'महाराणी, महंत गोपानंदाने बादशहाचे निराळेच मत सांगितले होते,' बाजबहाद्दरला आपण अनेक लढायात चीतपट केले असल्यामुळे आम्ही आपल्यावर खूष आहोत; नि गोंडवनाचे संरक्षण करण्यासाठी म्हणून आम्ही आपल्याला तोफा-बंदूकांचे साहाय्य करू इच्छितो; असा काही तरी बादशहा अकबराचा निरोप होता.'

'कदाचित ह्या साऱ्या प्रकारात महंताने काही डाव रचला असेल.'

दरबारातील कुणी तरी शंका बोलून दाखविली.

'महंत तर सत्पुरुष वाटला मला. हा सारा वेगळाच मामला दिसतो.' वीर नारायणाने आपले मत मांडले.

पुन्हा एकदा दरबारात साऱ्याच प्रकारावर चर्चा सुरू झाली.

प्रत्येकाने आपापली मते मांडावयास सुरुवात केली, महाराणी दुर्गावती गप्प बसून सारी मते मनाच्या कागदावर टिपून घेत होती. दिवाण आधारसिंह गप्प होता.

'महंत सदा ध्यानमग्न राहात होते. पूजा–अर्चेत गढलेले असत.' मधेच एकाने म्हटले.

'त्यांचे मोठेपण पटले म्हणूनच बादशहा अकबराने त्यांना शिष्टाईसाठी आपल्याकडे पाठविले. त्यांच्याबरोबर आपले सैन्य-देखील दिले.' दुसऱ्याने पहिल्याला दुजोरा दिला.

'त्यांचा दया-धर्म तरी किती! गोमातेची पूजा रोजरोज केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. मला नाही वाटत महंताचा ह्या साऱ्या बनावात काही हात असेल'

आणखी एका मानकऱ्याने आपले मत दिले.

'मलाही असेच वाटते. बाजबहादूराविरूद्ध लढताना आपले कुठल्याही प्रकारचे साहाय्य आम्हाला नको आहे, हे आम्ही बादशहाला आवर्जुन कळविले होते. मग असे असताना हे फरमान का? मला वाटते, बाजबहाद्दरशी लढताना आम्ही दाखविलेल्या पराक्रमामुळे बादशहाला हेवा वाटत असेल अन् त्यातच भर म्हणून त्याच्या सरदारांनी त्याला हा बदसल्ला दिला असेल. नाही कशावरून?'

दिवाण आधारसिंहाने आपले मन उघडे केले.

इतके होईपर्यंत महाराणीने आपले संतप्त मन मोठ्या शर्थीने काबूत आणले होते.

'असेल. असेही घडले असेल!'

तिने म्हटले अन् क्षणभर ती थांबली.

मग हलकेच तिने प्रश्न केला, 'महंतजींचा पत्ता काय?'

आधारसिहांनी म्हटले, 'दिल्लीच्या बाजूला गेले, असे ऐकलेय् आम्ही. त्यांचे निवासस्थान आहे मेवाडमध्ये.'

महाराणीने खूप वेळ काही तरी आठवल्यासा केले नि मग म्हटले, 'खरेच मोठे संत महंत दिसतात ते. मला वाटते, मी त्यांना गौर नदीच्याकाठी एका योगाश्रमात पाहिलेय् आता कैक वर्षे झाली त्या गोष्टीला. त्या दिवशी दु न पाहिले. त्यामुळे चटकन् ओळख पटू शकली नाही. आता अंधुक अंधुक आठवतेय्....ठीक आहे चला. घडले ते घडले. पण यापुढे आपल्याला कुठल्याही प्रसंगाला तोंड द्यावयास सिद्ध असले पाहिजे.'

होय, महाराणी.'

सर्वांनी होकार भरला

–अन् त्याच रात्री महेश ठाकूरचे गडावर कथावाचन झाले. कथा पुरी करताना तिचे तात्पर्य सांगावयास महेश ठाकूर विसरला नाही. कथेचे तात्पर्य होते– 'हातून कार्य पुरे होत नसेल तर देहत्याग करून नाहीसे व्हावे.'

महेश ठाकूरची कथा अन् कथा-वाचनाची त्याची खास ढब ही दोनही महाराणी दुर्गावतीला एकदम आवडल्या. तिचा कथा ऐकून उत्साह वाढला.

आपला हा उपदेश कधीच कुणाला विसरून चालणार नाही. आम्हीही यापुढे साऱ्यांनाच अशी प्रेरणा देऊ. आमच्या महालातच नव्हे तर आमच्या मनावर आपले हे तात्पर्य आम्ही कोरून ठेवू.' महाराणी दुर्गावती उत्साहाच्या भरात म्हणाली.

जवळ बसलेल्या रामचेरी अन वीर नारायण ह्यांच्या मनावरही त्या तात्पर्याने चांगलीच मोहिनी घातली होती. शेवटचे

तात्पर्याचे वाक्य त्यांनी स्वत:शीच दोन-तीन वेळा घोकले. महाराणी सारखाच त्यांनी स्वत:च्या मनाशी निश्चय करून टाकिला. 'आम्ही एकतर आमच्या कर्तव्यात दंग राहू; नाही तर प्राणत्याग करू...'

दुसऱ्याच दिवशी महेश ठाकूरच्या कथेचे ते तात्पर्य थोरा-मोठ्यांपासून ते लहानांपर्यंत पोहोचविण्यात आले. आता महाराणी दुर्गावती दुसऱ्याच कामात गढली. शेतकरी अन् शिल्पकार ह्यांचे भले कसे होईल; हे पाहण्यात ती आपला वेळ घालवू लागली. बावीस-तेवीस हजार छोटी मोठी खेडी असलेला गोंडवनाचा भू-भाग. त्यापैकी अर्ध्या अधिक भागातून महाराणीचा सेवकवर्ग कर-वसुली करीत होता. उरलेला अर्धा हिस्सा जमीनदार वर्गाच्या हातात होता. ह्या साऱ्यांना महाराणीने सक्त हुकूम सोडला-- 'कुणाकडूनही दांडगाईने वसुली होता कामा नये. अधिक पाऊस पडल्यामुळे पिकांची हानी झाल्यास किंवा दुष्काळ पडल्यास हवे असलेले सहाय्य सरकारी तिजोरीतून दिले जावे.'

आपण दिलेल्या हुकुमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते आहे की नाही, हे ती स्वत: हिंडून पाहू लागली. शिल्पकार चित्र कार अन् हरएक प्रकारच्या कलावंतांना प्रोत्साहन देताना महा-राणीला स्वर्ग देखील ठेंगणा वाटू लागला. महाराणीच्या प्रयत्नां-मुळेच त्यांच्या कलेला गोंडवनाबाहेरही किंमत येऊ लागली. अन् हे सारे घडत असतानाच तिने आपले सारे लक्ष सेनेची तयारी अन् भक्कम पायावर उभारणी करण्यावर केंद्रित केले.

अन् त्यातच तिला एका युद्धाला तोंड द्यावे लागले. ह्या वेळी तिच्यासमोर उभा ठाकला होता बेरानचा सुल्तान. त्याने युद्धात एक नवाच डाव टाकला होता. चारही बाजूंनी पठारांनी वेढलेल्या मैदानात महाराणीच्या सैन्याची कोंडी करावयाची अन् मग त्याच्या

वर भीषण हल्ला करावयाचा, अशी होती त्याची ही योजना. पण महाराणी दुर्गावतीच्या चलाख नजरेने ही योजनाही बरोबर हेरली अन् वेळीच सावधगिरीची पावले टाकून सुल्तानाची योजना उधळून लावली. बेरारच्या सुल्तानाला बाजबहाद्दरासारखेच हात चोळीत परतावे लागले.

बेरारच्या सुल्तानावर विजय मिळवून महाराणी पुन्हा चौरागडावर परतली. गडावर तिचे जंगी स्वागत झाले. सुवासिनींनी नि वृद्ध मंडळींनी महाराणीला तोंड भरून आशीर्वाद दिले. ह्या साऱ्या सोहोळच्यात हजर नव्हता तो महेश ठाकूर. काही काळासाठी अन् कसल्यातरी महत्वाच्या कामासाठी त्याला गोंडवनाच्या बाहेर जावे लागले होते. महेश ठाकूरची जागा त्याचा शिष्य रघुनंदन ह्याने घेतली होती त्याने पुढे होऊन महाराणीला आशीर्वाद दिले 'उभ्या भूखंडावर महाराणीचे राज्य राहो. अन् आकाश पाताळही त्यांच्या आज्ञांचे पालन करोत'

महाराणी ते आशीर्वाद ऐकता ऐकता उपहासाने हसली. रघुनंदन वयाने तिच्यापेक्षा लहान असूनही त्याने ते विसरून आशीर्वाद दिले होते. अन् महाराणी नेमके त्यालाच हसली होती. त्या हसण्याचा अर्थ मात्र रघुनंदनच्या लक्षात आला नाही. महाराणी हसली म्हणून उलट त्याला आनंदच वाटला.

त्या समाधानाने त्याचे डोळे लकाकले. हलकेच त्याने महाराणीला म्हटले, 'राणीसरकार, आणखी एक पंधरवड्यानंतर माझ्या घरी छोटासा उत्सव होणार आहे. आपण त्याला यावयास हवे. त्यादिवशी मी आपल्यासमोर कथा वाचन करणार आहे.'

'जरूर. रघुनंदन, आम्ही जरूर हजर राहू या उत्सवाला.' महाराणीने आमंत्रणाचा स्वीकार केला.

• •

## प्रकरण : ४

रघुनंदनाच्या निमंत्रणाचा महाराणीने नुसताच स्वीकार केला नाही; ती तर खरोखरच त्या उत्सवासाठी म्हणून त्याच्या घरी जातीने हजर झाली. बरोबर रामचेरी अन् वीरनारायणही होते. केवळ उत्सव साजरा करण्यापुरतेच असते; तर ते काम लवकर संपले होते. ती परत परतूही शकली असती. पण तसे तिला करावयाचे नव्हते. नुकत्याच बेरारच्या सुलतानावर मिळविलेल्या विजयानंतर होणारे रघुनंदनाच्या घरचे कथावाचन ऐकावयाची तिची फार फार इच्छा होती म्हणूनच की काय, उत्सव-सोहोळा पार पडेपर्यंत तिथे थांबावयाचे तिने मनाशी ठरवले.

मुख्य उत्सव संपला नि कथा-वाचनाला रघुनंदनाने सुरुवात केली. महाभारतातील एका कथा भागावर आधारलेली कथा होती ती. प्रसंग द्रोपदीहरणाचा होता. रघुनंदन मूळ संस्कृत श्लोकांचा अर्थ हिंदीतून समजावून देत होता. कथाभाग ऐकता ऐकता सारेच रंगले होते.

मधेच वीरनारायणाने म्हटले, 'काय युधिष्ठिर विचित्र पाहा. आपल्या बायकोलाच त्याने जुगारावर लाविलेन् !'

'त्या काळात जुगार खेळण्याचा रिवाजच होता,' रघुनंदनाने खुलासा केला.

'अन् बायकोचा जुगार मांडण्याचा पण?'

वीरनारायणाच्या शब्दाशब्दातून राग पाझरत होता.

राणी दुर्गावती किंचित् हसली अन् म्हणाली, 'खरेच, जराशी विचित्रच गोष्ट आहे ही ! मनुस्मृतीत तर चक्क म्हटलेय् की, जिथे स्त्रियांची कदर होते, पूजा होते, तिथे देवांची वस्ती असते. अन्

हे दृश्य तर अगदी त्या उलट दिसतेय. युधिष्ठिराने द्रौपदीला जुगारात उभी करायला नको होते.'

तिने मधेच थांबून एक क्षीण उसासा टाकिला. सारेच जण तो कथाभाग ऐकून गदगदून गेले होते.

'ठीक आहे, रघुनंदन पुढे सांगा.'

तिने रघुनंदनला कथा-वाचन पुढे चालू करण्यास संमती दिली. अधूनमधून होणाऱ्या ह्या अडथळ्यांमुळे बिचाऱ्या रघुनंदनची स्थिती मोठी चमत्कारिक झाली. पण तरीही त्याला थांबून चालण्यासारखे नव्हते. स्वतःला सावरीत त्याने पुढे वाचावयास सुरुवात केली.

'युधिष्ठिराचे हे असे वागणे भीमाला काही आवडले नाही. त्याने आपल्या धाकट्या भावाला–अर्जुनाला–आज्ञा सोडली, 'कुठून तरी जाऊन विस्तव पैदा कर. मला ह्या युधिष्ठिराचे हात पोळून काढावयाचे आहेत. द्रौपदीला पणाला लावायचा अधिकार ह्याला कुणी दिला?'

'हे ठीक झाले!'

वीर नारायणाला आनंद झाला.

'अगदी योग्य झाले!' रामचेरीने म्हटले.

कथा-वाचनात पुन्हा एकदा खंड पडला. रघुनंदनला हा खंड आवडला नाही. पण घडत असलेल्या प्रकाराला त्याचा इलाजच नव्हता.

'रघुनंदन, पुढे चालू द्या.' महाराणीने हुकूम सोडला.

रघुनंदन पुढे सांगू लागला–'अर्जुनाने नानाविध प्रकारे भीमसेनाची समजूत काढिली; तेव्हा कुठे भीमसेनाचा राग थोडासा शांत झाला.'

'अन् बिचाऱ्या द्रौपदीचे हाल सुरू झाले.' रामचेरीने म्हटले.

'होय. तसे घडले म्हणून तर महाभारतासारखे युद्ध पेटले. अन् त्या युद्धाने दुष्ट, दुराचारी दुर्योधन वगैरे बळी घेतले.' रघुनंदनाने महाभारताचे कारण सुटसुटीत करून सांगितले.

'ते काहीही घडलेले असो युधिष्ठिराचे ते कृत्य मोठे चांगले होते, असे कुणी म्हणणार नाही. युधिष्ठिराला ह्यामुळे महापुरुषही म्हणता येणार नाही '

वीरनारायणाची टीका चालूच होती. रघुनंदनाला बरे वाटले नाही. 'सरकारच्या चरणी नम्र विनंती. असे सारखे मधे मधे बोलून सरकारांनी कथावाचनात खंड पाडू नये. नाहीपेक्षा मी कथावाचनच इथे बंद करतो कसा.'

रघुनंदनाच्या शब्दातून त्रासिकपणा डोकावत होता. महाराणी दुर्गावतीला तो आवडला नाही. झटकन तिने म्हटले–'वीर नारायण म्हणतो त्यात काहीच चूक नाही. पण म्हणून त्यासाठी कथावाचन बंद करण्याचे काहीच कारण दिसत नाही. पुढे चालू ठेवा.'

रघुनंदनने नजर वर उचलून एकदा महाराणीच्या नजरेला नजर दिली. त्या नजरेतील तेज विलक्षण होते कथावाचन संपवता संपवता त्याने एक सर्वस्वी विसंगत गोष्ट सांगितली

'ठकाबरोबर ठक नि साधूबरोबर साधू असावे, अशी एक जुनी म्हण आहे. युधिष्ठिरही एक सज्जन गृहस्थ होता. म्हणूनच त्याला शेवटी विजय मिळाला. अन् दुसरे असे की, वैरी पळून जात नसेल; तर न जाऊदे. आपणच मग पलायन करावे.'

रघुनंदन आपल्याच कल्पनेवर खळखळून हसला. महाराणी दुर्गावतीने नजरेच्या नुसत्या इशाऱ्यानेच साऱ्यांना दटावले. सारे गप्प बसले.

रागाच्या भरात तिने म्हटले– 'ह्या गोष्टी तर भित्ऱ्या कमकुवत लोकांनी करावयाच्या आहेत. अन् म्हणूनच टाकाऊ आहेत. रघुनंदन, तुम्ही पंडित नि विद्वान्-व्यासंगी. तुमच्यासारख्यांनी असल्या विकृत, विसंगत गोष्टी कराव्या? तुमचे कथावाचन ह्या गोष्टीशिवाय काय पुरे होऊ शकत नाही? हा शुद्ध वेडेपणा आहे.'

'अगदीच वेडेपणा!' रामचेरी सहजगत्या बोलून गेली.

रघुनंदनने चमकून पाहिले. वीर नारायण त्याच्याकडे पाहून हसत होता. त्याला स्वतःचे हसे आवरणेही धड जमत नव्हते. रघुनंदन ह्या साऱ्या प्रकाराने थरारून गेला. आपले पांडित्य फुकट आहे, असे त्याला राहून राहून वाटू लागले. पण तितकाच त्याला झाल्या प्रकाराने संतापही आला.

काहीशा घुश्यातच त्याने म्हटले–'हा ब्राह्मणाचा अपमान आहे. मी ह्यापुढे कधीच कथा-वाचन करणार नाही. आमचे कथा-वाचन ऐकण्याच्या लायकीचा इथे कुणीच दिसत नाही!'

रघुनंदन एवढे बोलला मात्र वीर नारायण एकदम हसावयाचा थांबला. संतापाने नि रघुनंदनने केलेल्या अपमानाने त्याचा राग उफाळून वर आला. काहीतरी करण्यासाठी त्याचे हात सळसळू लागले होते. त्याच्या मनाची झालेली ही अवस्था महाराणी दुर्गावतीने केव्हाच ओळखली होती. नजरेचा संकेत करूनच तिने त्याला गप्प बसावयास भाग पाडले. स्वतःच्या मनावर तिने विलक्षण ताबा मिळविला अन् पुन्हा कसलाही अनिष्ट प्रकार घडू नये म्हणून तिने कथा-वाचन संपण्यापूर्वीच चौरागडाची वाट धरली. अर्थात्च तिच्या सहकाऱ्यांनाही मग तिच्या मागोमाग जावेच लागले.

महेश ठाकूर परत आला तेव्हा शिष्य रघुनंदनने सारा प्रकार तिखटमीठ लावून त्याच्या कानांवर घातला. तो ऐकून

त्याला अतिशय दुःख झाले. आता ह्यापुढे इथे राहणे योग्य नाही, असे मनाशी ठरवून त्याने गाव सोडला अन् तिथून खूप दूर अंतरावर असलेल्या बस्तरकडे तो निघून गेला. जाताना त्याची कल्पना अशी होती की, महाराणीकडून आपल्याला पुन्हा बोलावणे येईल. आपला मान राखला जाईल. पण प्रत्यक्ष मात्र तसे काहीच घडले नाही !

काही काळ महेश ठाकूर आपल्या लाडक्या शिष्यासह बस्तरलाच मुक्काम ठोकून राहिला. त्याच्या कथा-वाचनामुळे बस्तरच्या राजाचे मन प्रसन्न झाले. पण ते सुखही महेश ठाकूरला अपुरे वाटू लागले त्याच्या मनात वारंवार येऊ लागले. –'कुठे ते महाराणी दुर्गावतीचे उदार वागणे नि कुठे हा बस्तरच्या राजाने केलेला छोटासा सत्कार!' त्या प्रकाराने त्याचे मन विटून गेले अन् त्याने चौरागडावर जाण्याचा पुन्हा एकदा विचार केला. मोठ्या खुबीने त्याने एकदा बोलता बोलता बस्तरच्या राजापुढे आपली ही कल्पना बोलूनही दाखविली. अन् राजानेही त्याला कुठलेही आढेवेढे न घेता जाण्याची परवानगी दिली. महेश ठाकूर प्रत्यक्ष जावयास निघाला तेव्हा त्याने आपल्याजवळ असलेल्या अनेक हत्तींपैकी आठ हत्ती त्याला नजर केले. त्या आठांपैकी एक होता पांढऱ्या रंगाचा.

आठ हत्ती बरोबर घेऊन महेश ठाकूर नि त्याचा शिष्य रघुनंदन चौरागडावर परतले. महाराणी दुर्गावतीच्या चरणावर डोके ठेवून त्या दोघांनीही घडल्या प्रकाराबद्दल तिची मनापासून क्षमा मागितली.

महाराणीने त्यांना म्हटले, 'ठाकूरजी, खरे म्हणजे कथा-वाचन चालू असताना कुणीही त्यात असा खंड पाडणे बरे नव्हे.

झाली ही चूक आमचीच झाली. त्याबद्दल आम्हीच आपली माफी मागावयास हवी.'



दोघांनी चमकून महाराणीकडे पाहिले. तिच्या साऱ्या चेहऱ्यावर खेद भरून–पसरून राहिला होता. 'तिने म्हटले होते ते अगदी मनापासून म्हटले होते,' ह्याची जाणीव होताच दोघेही सद्गदित झाले. किती वेळ त्यांना काय बोलावे, हेच सुचत नव्हते!

महेश ठाकूरने निघण्यापूर्वी महाराणीला तो बस्तरच्या राजाकडून मिळालेला पांढरा हत्ती भेट म्हणून दिला तो देताना त्याने म्हटले– 'महाराणी, हा केवळ आपल्याच स्वारीला योग्य आहे. आमच्या आशीर्वादासह त्याचा आपण स्वीकार करावा.'

मोठ्या आनंदाने महाराणीने पांढऱ्या हत्तीची ती भेट स्वीकारली. अन् त्याच्या बदल्यात त्याला भली मोठी सुवर्णरास भेट दिली. त्या सुवर्णराशीतूनच महेश ठाकूरने तिथून जवळच एक छोटासा गाव वसविला अन् एक सुंदर तलावही बांधून काढिला.

महेश ठाकूरने वसविलेल्या त्या गावाचे नाव होते महेशपूर नि त्या सुंदर तळ्याचे नाव होते ठाकूरताल !

● ●

## प्रकरण : ५

बाजबहाद्दराची गोंडवनावरची आक्रमणे अजून चालूच होती. अन् त्या प्रत्येक खेपेस तो हरतच होता. आता त्यात दिल्लीपती अकबराच्या आक्रमणाची भर पडली बाजबहाद्दराचा अकबराच्या ह्या आक्रमणापुढे टिकाव लागला नाही. अन् चौरागडच्या पश्चिमेकडे असलेल्या पहाडी मुलुखाकडे पळून जाऊन तो तिथेच लपून राहिला पण तिथूनही त्याला महाराणी दुर्गावतीच्या सैन्याने हुसकावून लावले. तरीही मानी मनाच्या बाजबहाद्दराने अकबराची शरणागती पत्करावयाचे नाकारले. चिडून जाऊन अकबराच्या सेनेने बाजबहाद्दराच्या मुलुखात सरळ धुमाकूळ घालावयास सुरुवात केली. भीषण अत्याचार झाले. अकबराच्या सेनेची बरोबरी करणे बाजबहाद्दराच्या मंडळींना जमू शकले नाही. अगदीच नाइलाज झाला तेव्हा अखेर बाजबहाद्दराने बादशहा अकबराचे पाय धरले अन् त्याच्या कृपाप्रसादाने तो सुखाने काळ घालवू लागला. त्याच्या जीवनात आता जगण्यासारखे काही राहिले नव्हते. महाराणी

दुर्गावतीला घडणाऱ्या ह्या गोष्टींची खडान्‌खडा माहिती मिळालेली होती.

बादशहा अकबराच्या एका बेगमेचे नाव होते अनका. तिने अन् तिच्याबरोबर इतर बेगमांनी बादशहाला आपल्या दुष्ट-दुराचारी वागणुकीने अगदी भंडावून सोडले होते. त्यांच्या त्रासातून केव्हा एकदा सुटतो, असे बादशहाला होऊन गेले होते. त्यासाठी मार्ग शोधून काढण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न चालू होता. त्याचे मन त्याच एका गोष्टीचा सारखा विचार करीत होते. त्यातच बादशहा अकबराला दुसऱ्याच आणखी एका चिंतेने घेरले होते. बेगमा कसला तरी बनाव घडवून आणण्याच्या तयारीत होती, त्याच्या काही दिवसच आधी फार मोठा दुष्काळ पडला होता. ह्या दुष्काळाचा अतिशय वाईट असा परिणाम उभ्या उत्तर भारतावर झाला होता. ह्यालाच जोडून बिहार नि बंगालमधील पठाणांनी दिल्लीपतीच्या विरुद्ध बंड पुकारले होते. पंजाब अन् काबूल हे दोन्ही प्रांत बादशहा अकबराच्या ताब्यात होते तरी तिथला एकूण राज्यकारभार बेगम अनकाच्याच हातात होता. अन् तो तिच्याकडून काढून घेऊन स्वतःकडे ठेविण्याचे त्याचे प्रयत्न चालू होते.

ह्याच वेळी माळव्यातील बखेडा उभा राहिला. पराभूत झालेल्या बाजबहाद्दराने पुन्हा आपल्या शक्तीचा संग्रह केला; सैन्य गोळा केले अन् थोडीशी तयारी करून त्याने अकबर बादशहाने माळव्यात नेमलेल्या सुभेदाराशीच सरळ दोन हात केले. आपल्या सुभेदाराचे बाजबहाद्दरापुढे काही चालत नाही, असे पाहून स्वतः बादशहानेच माळव्याकडे कूच केले. अकबरापुढे बाजबहाद्दराचे काहीच चालू शकले नाही. तो पराभूत झाला अकबरासमोर उभे राहण्याची वेळ आली तेव्हा बाजबहाद्दराने बेडरपणे बादशहाला

सुभेदाराने केलेल्या दुष्कृत्यांचा पाढा त्याच्यापुढे वाचला. बादशहाला ह्या साऱ्या प्रकाराचा निर्णय देणे अवघड झाले. बाजबहाद्दर नि सुभेदार ह्या दोघांना घेऊन बादशहा दिल्लीला आला. साऱ्या प्रकरणाचा पुन्हा एकदा शांतपणे विचार करून अकबराने बाजबहाद्दरला आपली मन्सबदारी बहाल केली नि त्याची मोठ्या सन्मानाने पुन्हा माळव्याला रवानगी केली. घडल्या प्रकारात सुभेदाराच्या माथी कलंक लाविण्यात आला अन् त्याची आग्र्याच्या किल्ल्यावर धिंड काढून बेइज्जत करण्यात आली.

हे सारे घडत असतानाच महाराणी दुर्गावतीचा निरोप घेऊन महंत गोपानंद बादशहा अकबराजवळ पोहोचला. महाराणीच्या उत्तरातील भाषा अन् भावना ह्यांची जाणीव होताच बादशहाचे डोके उसळून उठले. साधू गोपानंदाकडून त्याने गोंडवनाबद्दलची सारी माहिती तपशीलवार ऐकली. महाराणीच्या सुनेबद्दल खडा न् खडा माहिती विचारून घेतली.

'जरा सवड मिळाली की, मी ह्याबद्दल माझी योजना तयार करीन. तोपर्यंत इथे वरचेवर येऊन आम्हाला अशीच महत्त्वाची माहिती पुरवीत चला. वेळ आली की सारे व्यवस्थित घडत जाईल, हे लक्षात असू द्या.'

महंत गोपानंदाला त्यानंतर आग्रा सोडून जावेच लागले! गोंडवनामध्ये काय शिजते आहे; काय घडते आहे; ह्याची तपशीलवार माहिती काढून आणणे, हीच त्याची आता बाकी उरलेली कामगिरी होती. हाताशी आलेली माहिती बादशहापर्यंत वेळेवर पोहोचविण्याचे काम तो चोख पार पाडीत होता. तो बजावीत असलेल्या कामगिरीबद्दल बादशहाकडून त्याला पैशाच्या स्वरूपात योग्य ते मानधन मिळत होते. बस्स तेवढेच! त्यापेक्षा

बादशहाने त्याला अधिक काहीच दिले नाही. तसा त्याच्याजवळ पैसा आधीपासूनच होता. त्यात ही भर. त्यामुळे धनाची कमतरता अशी त्याला कधीच पडली नाही. त्याचा यात्रेचा कार्यक्रम ह्या धनसंचयमुळे अगदी सुरळीत चालू होता. अगदी कुठलीही अडचण न येता! उत्तरेकडली तीर्थक्षेत्रे अन् अन्य काही ठिकाणी त्याचे वरचेवर जाणे-येणे घडू लागले. असे होते तरी गोंडवनावरले त्याचे लक्ष उडाले नव्हते. तिथे घडणाऱ्या प्रत्येक घटनेची नोंद घेण्याचे त्याचे काम अव्याहत चालू होते. ह्याबद्दल त्याला कधी कुणी विचारलेच, तर तो चटकन् उत्तर देई– 'गोंडवनामधल्या गाईंना त्राण देणे; हे खरे म्हणजे माझे काम. त्यांचे रक्षण मला करायलाच हवे'

उत्तरेकडल्या आपल्या मुलुखात शांतता नि सुव्यवस्था राखण्याचे काम बादशहा मनापासून नि साऱ्या शक्तीनिशी करीत होता. आपल्या साम्राज्याचा विस्तार करणे नि शक्य होईल तेव्हा आपल्या ताकदीचे, पराक्रमाचे प्रदर्शन करणे, ह्या बादशहाच्या मोठ्या आवडीच्या गोष्टी. साहजिकच ह्या दोनही हव्यासापायी दिल्ली राजधानी असूनही तिथे त्याचा पायच ठरत नव्हता. त्याची महत्त्वाकांक्षी वृत्ती त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. दुआबच्या खोऱ्यातून हिंडता हिंडता तो अखेर माणिकपूरला येऊन थडकला. बिहार बंगालमधले पठाणांचे बंड त्याला मोडून काढावयाचे होते. पण त्यापूर्वी थोडी विश्रांती घेणे त्याच्या दृष्टीने आवश्यक वाटू लागले होते. म्हणूनच त्याने माणिकपूरमध्ये काही दिवस आपला तळ ठोकला. ह्या मुक्कामातच बिहारबंगाल स्वारीची योजना तो ठरविणार होता. माणिकपूरच्या आपल्या मुक्कामात ह्या योजनांचा विचार करीत असतानाच बादशहाने गंगा यमुनेच्या संगमाला भेट

दिली होती. प्रयागतीर्थ पाहिले. ह्या दोनही ठिकाणांविषयीची प्रसिद्धी ह्यापूर्वीच त्याच्या कानांवर आलेली असल्यामुळे त्याची बघण्याची उत्सुकता वाढली होती. गंगायमुनेच्या संगमावर गेला असतानाच बादशहाची महंत गोपानंदाशी अचानक भेट घडली.

भविष्यकाळातील एका फार मोठ्या सम्राटाला खूष करण्यासाठी म्हणूनच की काय, गोपानंदाने त्याला शक्य तितका लवून मुजरा केला नि म्हटले, 'जहाँपनाह—'

अं?'

'इथल्या यात्रेकरूंवर यात्रा कर लावला जातो. तो माफ व्हावा, अशी जहाँपनाहांच्या चरणी नम्र विनंती आहे. असे घडले तर जोवर चंद्र सूर्य आहेत; तोवर आपली कीर्ती अमरच राहील.'

संगमावरची दृश्ये नि तिथे जमलेल्या भाविक यात्रेकरूंच्या भावनांचे दर्शन घडल्यामुळे बादशहा अकबराचे मन आधीच एका वेगळ्या वातावरणाने भरून आले होते. त्याच्या मनावर वेगळाच परिणाम घडून आला होता. त्याचे मन उल्हसित झाले होते.

चटकन् त्याने म्हटले, ' महंतजी, ह्याच ठिकाणाबद्दल का म्हणता? आम्ही तर हिंदुस्तानातील साऱ्याच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणचा यात्रा-कर माफ करू इच्छितो. तशी घोषणाच आम्ही आज करतो.'

गोपानंद नि त्याच्याबरोबर बादशहाच्या भेटीला आलेले इतर काही यात्रेकरू त्या घोषणेने अतिशय खूष झाले; आनंदी झाले. त्यांच्या डोळ्यांत अन् चेहऱ्यावर कृतज्ञता भरून राहिली. बादशहा आनंदित झालेल्या त्या यात्रेकरूंच्या बरोबर थोडा वेळ संगमावर फिरत राहिला. फिरता फिरता तिथे असलेल्या अक्षयवटाजवळ सारे येऊन उभे राहिले. अक्षयवटाजवळ एक छोटासा

स्तंभ होता. त्या स्तंभावर कसलासा मजकूर लिहिलेला होता. भाषा परिचयाची नसल्यामुळे तो मजकूर वाचणे अन् त्याचा अर्थ समजून घेणे शक्य नव्हते.

तिथे जवळच उभ्या असलेल्या एका पंड्याच्या ही गोष्ट चटकन् लक्षात आली.

'सरकार, अनादिकालापासून हा स्तंभ इथेच आहे.'

बादशहाने फक्त 'हूं' केले नि तो किंचित हसला. पण त्या हसण्याला अविश्वासाची काहीशी झाक होती. पटकन नजर बाजूला करीत बादशहाने महंत गोपानंदाकडे पाहिले. बादशहामागून तो हळुहळू चालत होता. चालताना त्याची नजर भुईकडे लागलेली होती.

बादशहाशी नजरानजर होताच महंत गोपानंद काय समजायाचे ते समजला.

'जहाँपनाह, आमची धार्मिक बाब आहे ही. परंपरेप्रमाणेच हे सारे ऐकत आलो आहोत आम्ही.'

महंत गोपानंदाच्याजवळ 'अक्कल' नावाची चीज आहे, ही गोष्ट बादशहाला आता चांगलीच जाणवली. त्याने महंताकडे पाहात मघाच्या त्या शिलालेखाकडे बोट दाखविले

'हे काय आहे ? काय लिहिलेय् त्यावर ?'

अगदी सहजपणे करावी तशी बादशहाने चौकशी केली.

बादशहाच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी दुसरा एक पंड्या पुढे आला. समोर येताच त्याने बादशहाला विनयाने नमस्कार केला.

'श्रीमान्‌जी, ह्यावर ह्या अक्षयवटाचा नि भगवंतांचा महिमा वर्णन केला आहे.' पंड्याने म्हटले.

पुन्हा तेच! बादशहाला काहीच उमज पडेना. त्याने पुन्हा एकदा महंत गोपानंदाकडे पाहिले. गोपानंदाने नजर वर करून बादशहाकडे पाहिले. मग डोळे बंद करून घेतले. दोनही हात जोडून क्षणभर तो नुकताच उभा राहिला. अन् मग त्याने बादशहाला म्हटले,

'जहाँपनाह, समुद्रपार करून प्रभु रामचंद्र लंकेला पोहोचले नि तिथे त्यांनी दुष्ट राक्षसराज रावणावर फार मोठा विजय मिळवला. परत जाताना ते इथे जरा वेळ थांबले होते. लंकेला जाताना त्यांनी समुद्रावर एक पूल बांधला होता. त्याला 'सेतूबंध' नाव आहे. आजही तो पूल तिथे दिसतो. ह्या खडतर कार्यात यश मिळाले म्हणून त्यांना काही पुण्यकर्म इथे राहून करावयाचे होते. समुद्राचे नाक ठेचून रावणाचा नाश करावयाचा, हे काही साधे काम नव्हते. इथे येताच त्यांनी ब्राह्मणांना नि साधुसज्जनांना आपल्याजवळ बोलावून घेतले. त्यांचा सन्मान केला अन् मोठ्या आनंदाने त्यांना खूप मोठे भूदान दिले. हीच सारी हकीकत ह्या स्तंभावर लिहिलीय्.'

सांगता सांगता महंत किंचित थांबला. त्याने एकदा बादशहाकडे पाहिले. बादशहा कसलासा विचार करीत अजूनही त्या स्तंभावरल्या मजकुराकडेच पाहात होता.

'जहाँपनाह—'

बादशहाला हाक मारून महंत गोपानंदाने त्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न केला.

'अं?'

बादशहाची विचारांची तंद्री भंगली.

'जहाँपनाह, आपणही अनेक शत्रूंवर असाच घवघवीत विजय

मिळवून आज इथे आला आहात. तेव्हा आपल्या चरणांशी एक विनंती



'कसली विनंती? बोला.'

'हुजूर, इथे आलाच आहात तर आपणही प्रभु रामचंद्राप्रमाणेच इथल्या पंड्यांना नि पुजाऱ्यांना उपकृत करावे.'

बादशहा मोकळेपणी हसला. त्याने आनंदाने पंड्यांना अन् पुजाऱ्यांना योग्य दान दिले.

दान देताना अकबराने म्हटले, 'ह्या ठिकाणी एक किल्ला बांधावा, असे मी ठरविले आहे. म्हणजे आपोआपच ह्या अक्षयवटाचे नि ह्या स्तंभाचे रक्षण होईल.'

बादशहा अकबराच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता एकदम वाढली.

त्याचा चेहरा त्या प्रसन्नतेने उजळला. ती प्रसन्नता पाहून व्यापारी पुजारीही प्रसन्न झाले. दुर्गा-

पण एवढे होईपर्यंत त्यांच्यापैकी कुणाच्याच एक गोष्ट लक्षात आलेली नव्हती.

तो स्तंभ समुद्रगुप्ताने आपला 'विजय-स्तंभ' म्हणून उभारला होता. त्याला खूप वर्षे झाली होती!'

● ●

## प्रकरण : ६

बिहारच्या जंगलातून डोके वर काढणाऱ्या पठाणांचा बंदोबस्त लावून झाला की, मगच हा किल्ला बांधण्याचे काम हातात घ्यावयाचे असा बादशहा अकबराचा विचार होता. अर्थात्च हा किल्ला बांधताना त्याच्या मनात दुसराही एक विचार खेळत होता. आपले सुभेदार नि ह्या भागातील आपली सेना ह्यांना राहण्यासाठी एक कायमचे ठिकाण असावे, असे त्याला फार दिवसांपासून वाटत होते. हा किल्ला त्या दृष्टीने त्याला नक्कीच उपयोगी पडणार होता. ह्या किल्ल्यावरूनच त्याला दूरदूरच्या ठिकाणावर हुकमत गाजविता येणार होती.

एकदा असेच संभाषण रंगात आले असताना संधी साधून नि मोठा धीर करून महंत गोपानंदाने बादशहाला त्याच्या वचनाची आठवण करून दिली.

'जहाँपनाह, बिहारमध्ये मी आपल्याला जहागिरी देईन, असे मागे एकदा आपण म्हटले होतेत. ह्या गोष्टीला आता खूप वर्षे झालीत. तेव्हा सहज आपले स्मरण करून द्यावे, म्हणून...'

मिळवून आ
विनंती ,दशहा जरा विचारात पडला. पण क्षणभरच्!

पटकन् त्याने म्हटले, 'आमचा पुढला मुक्काम कडा इथे असेल. तिथेच आम्ही ह्या गोष्टीचा विचार करू.

महंत गोपानंदाने बघितले, बादशहा अकबर आपले वचन पूर्णपणे विसरून गेला आहे. त्याला वाटले, 'बादशहाने वचन देऊन आता खूपखूप वर्षे उलटली आहेत. साहजिकच तो विसरून गेला असणार. जाऊ द्या असे होते कधी कधी . !'

चार दिवस मजेत घालवून बादशहाने आपला मुक्काम तिथून हलविला अन् तो कडचाला आला. कडचाचा सुभेदार ख्वाजा अब्दुल मजीद हा अकबराचाच एक नावाजलेला सरदार होता. पन्नाची लढाई जिंकून त्याने बादशहाच्या साम्राज्यात भर घातली होती. त्या कर्तृत्वाबद्दल बादशहाने त्याला मोठ्या गौरवाने 'असफखान्' ही पदवी बहाल केली होती अन् त्याशिवाय पाच हजारांची मनसबदारीही दिली होती

बादशहाचा मुक्काम गंगाकिनारी असलेल्या कडचाला पडला नि पाठोपाठच महंत गोपानंदही तिथे येऊन थडकला.

बादशहाला पक्के ठाऊक होते की, असफखान जसा चतुर नि रणकुशल आहे; तसाच भोगविलासी देखील आहे. असफखानाने बादशहाचे आगमन होताच त्याला भेटून आपल्या सुभ्याबद्दलची तपशीलवार हकीकत त्याच्या कानांवर घातली. अन् बोलण्याच्या भरात गोंडवनाबद्दलचा विषयही त्याच्याजवळ काढला बादशहाची नजर गोंडवनाकडे लागली आहे, ह्याची त्याला पुरतेपणी कल्पना होती.

अगदी सहजगत्या त्याने बादशहाला म्हटले, 'खाविंद, फिरस्त्या व्यापाऱ्यांकडून मी खूप गोष्टींची माहिती काढून घेतली आहे.

काश्यांची भांडी विकावयास घेऊन जाणारे गोंडवनचे बरेच व्यापारी इकडे नेहमी येत असतात. त्यांच्याकडून समजलंय् की, राणी दुर्गावतीजवळ कितीतरी कोटी धन आहे. अन् हिरे-मोती नि जडजवाहिर किती असेल ह्याची गणतीच नाही.'

'हे सारे कुठे आहे ?'

बादशहाने कुतुहलाने विचारले.

'जहाँपनाह, गढा, चौरागड, चंद्रगड, सिंगोरगड, हरियागड, देवगड अशा वेगवेगळ्या ठिकाणी ते आहे.'

'हे गड आहेत कुठे ? नि त्यांवरील एकूण परिस्थिती काय आहे ?'

प्रश्न करता करता अकबराने कान टवकारले.

'हुजूर, गढा आहे गोंडवनाची राजधानी. सिंगोरगडापासून चांगली बारा कोस दूर आहे ती. गढ्यापासून तीस-पस्तीस कोसांवर चौरागड आहे. ह्याच चौरागडावर तिचा फार मोठा खजिना आहे. गढाच्या पूर्वेस जवळ जवळ पन्नास कोसांवर चंद्रगड आहे. हा किल्ला आहे पहाडाच्या एका उंचच उंच टोकावर तिथेच खूपशा इमारतीही आहेत.'

असफखान सांगण्याच्या ऐन भरात आला होता. पण बादशहाने त्याला मधेच हटकले.

'मी हे नाही विचारीत तुला, असफखान.'

बादशहाच्या बोलण्याचा रोख असफखानाच्या मुळीच लक्षात आला नाही. त्याने आपली टकळी तशीच चालू ठेविली होती.

'खाविंद, हरियागड चौरागडाच्या दक्षिणेला तीस कोस अंतरावर आहे. एक पहाडी किल्ला म्हणून सिंगोरगडचे सर्वत्र नाव झालेले आहे. राणी दुर्गावती बराच काळ ह्याच किल्ल्यावर राहाते.

तसा तिचा मुक्काम गढा अन् चौरागडवरही असतो. पण तो अधून-मधून. गोंडवनामध्ये राणीने एकूण बावन्न किल्ले बांधले आहेत. माझ्या हेरांकडून मला ही सारी माहिती मिळाली.'

'किल्ल्यावरली एकूण परिस्थिती काय आहे ?'

असफखानाने दिलेल्या माहितीने अजूनही बादशहाचे समाधान झालेले दिसत नव्हते.

'जहाँपनाह, माझ्या हेरांना साऱ्याच किल्ल्याबद्दलची माहिती पुरतेपणी मिळू शकलेली नाही. मात्र एक गोष्ट पक्की की, राणी दुर्गावती दानधर्म खूप करते. अन्....अन्....'

असफखान सांगता सांगता दहादा अडखळला.

'अन्....? अन् काय?'

बादशहाच्या नजरेत चवकसपणे, ठसठशीतपणा उभा राहिला.

'अन् राणी दिसावयासही खूबसूरत आहे.'

असफखानाने आपल्याजवळची ही लाख मोलाची माहिती चटकन् बादशहाला देऊन टाकली.

बादशहा ती महत्त्वाची माहिती ऐकून गालातल्या गालात हसला. त्याने अगदी सहजपणे असफखानाकडे पाहिले.

'ठीक आहे, असफखान. ह्या नंतरच्या गोष्टी आहेत पण त्यापूर्वी आपल्याला फार महत्त्वाची बातमी हवी आहे.'

'कुठली, खाविंद?'

'असफखान, गढा, चौरागड, सिंगोरगड इथली परिस्थिती काय, तिथे आत जायला यायला वाटा किती आहेत, कुठून आहेत, कशा आहेत, तिथे दारूगोळा काय आहे, ह्याबद्दलची बातमी आपल्याला मिळवून आणावयास हवी. असली काही माहिती

तुमच्याजवळ आहे?' बादशहाने एका दमात सारे बोलून टाकले.

'अजून, जहाँपनाह, असली काहीच माहिती आमच्या हाती आलेली नाही. ती मिळवावयाचा आमचा प्रयत्न चालू आहे.'

'ठीक आहे. ह्याच्याच जोडीनें आणखी एक माहिती पण काढून आणा, ह्या राणीजवळ सैन्य किती आहे? त्याची तयारी कशी आहे? अन् हे सैन्य कुठे कुठे ठेवलेले आहे?'

बादशहाने सूचना केल्या.

'खाविंद, राणीच्या फौजेत पायदळ पन्नास हजार; वीस हजार घोडेस्वार अन् बाराशे हत्ती आहेत; असे ऐकले आहे. फौजेत सर्वात अधिक भरणा आहे गोंड लोकांचा. हे लोक जंगलीं वस्तू जमा करतात अन् त्या विकतात. तसेच ते शेतीही करतात. सैनिकी शिक्षणात ते चांगलेच वाकबगार आहेत. गोंड लोकांखेरीज फौजेत खूपसे रजपूत अन् पठाणपण आहेत ही सगळी फौज निरनिराळ्या किल्ल्यांतून विखरून ठेविलेली आहे. राणीचे काही मांडलीक राजेही आहेत. त्यांची फौज प्रत्येकाची वेगवेगळी आहे. स्वतंत्र आहे. सिंगोरगडावर ह्यांपैकी अधिक सेना असते.

असफखानाने दीर्घ खुलासा केला.

'अधिक म्हणजे किती?' बादशहानें विचारले.

'नक्की अंदाज मिळाला नाही, जहाँपनाह, पण त्या दिशेने प्रयत्न चालू आहेत. लवकरच हवी ती माहिती मिळेल.'

'असफखान, राणीजवळ तोफा किती आहेत?'

'खाविंद, फारच थोड्या. अन् ज्या आहेत त्या अगदीच मामुली आहेत. राणीजवळ असलेल्या हत्तींपैकी बरेचसे हत्ती मंडलामध्ये ठेवलेले आहेत. उरलेले वेगवेगळ्या किल्लेदाराकडे वाटून दिलेले आहेत. त्यांचा तपशील मी खाविंदांना केव्हाहीं देईन.

'राणी दुर्गावती दिसायला सुंदर दिसते का? वय काय तिचे, असफखान?' बादशहाने चवकशी केली.

'खाविंद, ह्या राणीचे वय असेल काही नाहीतरी पस्तीस छत्तीस. पण ती तेवढी वाटत नाही. अन् दिसायला खूबसूरत पण आहे.'

बादशहा अकबर किंचित् हसला. मग जरा वेळ त्याने दूर-वर आपली नजर लावली.

'तुमचे कसे चाललेय् असफखान?' बादशहाने मध्येच विचारले.

'ठीक आहे खाविंद. आपल्या कृपेने मजेत चाललेय्.'

बादशहा पुन्हा एकदा मोकळेपणी हसला.

'हे पाहा, असफखान, तुम्हाला फार जपून वागायला हवे. कसूर करून चालणार नाही. आता तुमच्या जोडीला महंत गोपा-नंदाला देणार आहे. हा माणूस आपला आहे. तो तुम्हाला चांगली मदत करील. सारा गोंडवन ह्या माणसाने पायाखाली तुडविला आहे. तो राणीकडील बारीक सारीक खबर तुम्हाला देत राहील. तुमचे काम आहे फक्त संधीची वाट पाहात राहण्याचे. ती मिळाली की, तुम्ही गोंडवनावर हल्ला चढवावयाचा आहे बिहार–बंगालची फिकीर आता तुम्ही करू नका. जोनपूरचा आमचा सुभेदार तिकडले काम ह्यापुढे पाहील. अन् तशीच जरूर भासली तर आम्ही स्वत:च जातीने तिकडे जाऊ. आमच्या मागे तशी दुसरीही महत्त्वाची कामे आहेत. अन् म्हणूनच ही इकडली जबाबदारी आम्ही तुमच्यावर सोपवीत आहोत. आले ध्यानात?'

बादशहा अकबराने आपल्या एकूण योजनेचा सविस्तर आराखडा असफखानापुढे मांडला.

'जहाँपनाह, गोंडवनाचा पुरतेपणी बंदोबस्त करून मगच आम्ही आराम करू.'



असफखानाकडून एवढे आश्वासन मिळाल्यावर बादशहाने हा विषय सफाईने बदलला. असफखानाबरोबर त्याने जंगली जनावरांच्या शिकारीबद्दल विषय काढला अन् त्याविषयी चर्चा सुरू केली. थोडा वेळ चर्चा करून मग बादशहाने असफखानाला जाण्याची अनुज्ञा दिली. अनुज्ञा मिळताच असफखान निघून गेला. अन् बादशहाने महंत गोपानंदाला बोलावून आणण्याची सेवकाला सूचना केली.

महंत गोपानंद अशा आमंत्रणाची वाट पाहातच होता. तो लगोलग बादशहाच्या भेटीला हजर झाला. बादशहाबरोबर त्याची

अनेक विषयांवर चर्चा झाली. असफखानाकडून मिळालेल्या एकूण माहितीपेक्षा थोडीशी अधिक माहिती त्याने बादशहाला पुरविली. पण बादशहा अकबराला ती तेवढीशी महत्त्वाची वाटली नाही. महंत गोपानंदाने माहिती देण्याच्या ओघात पंचगावाजवळ असलेल्या एका उंचच उंच पर्वताचा उल्लेख केला होता अन् त्या पर्वतराजीवर असलेल्या मंदिरांबद्दल माहितीही बादशहाला त्याने निवेदन केली. पंचगाव मंडलामध्ये असल्याने त्याने बादशहाच्या कानांवर घातले होते.

मंदिरांविषयींची ही सारी माहिती ऐकून बादशहानें हलकेच म्हटले, 'महंत, आमचे सैनिक तुमच्या ह्या हिंदुंच्या मंदिरांना कधी हातदेखील लावणार नाहीत.'

'जहाँपनाह, केवळ एक विनंती म्हणून...' महंत गोपानंदाने अडखळत अडखळत म्हटले.

'हा हा महंत, विचारा ना, काय विचारायचे ते !'

बादशहाने चटकन् अनुज्ञा दिली.

'जहाँपनाह, गढाच्या दक्षिणेस सत्तर-ऐंशी कोस अंतरावर लांजी नावाचे एक नगर आहे. तिथे एक किल्लाही आहे. जरासा उंचीवरच आहे आहे हा किल्ला अन् चांगलाच मजबूतही आहे. लांजीला काही जुनी जुनी देवळेही आहेत. पण मला त्यासंबंधात कसलीच विनंती करावयाची नाही. मला सांगायचेय ते दुसरेच. हा परगणा मोठा आहे. तिथले जंगलही फार मोठे नि लांब-रुंद आहे. खूप मोठीं जंगले नि चांगले पीक देणारी शेतेही तिथे आहेत. संपत्तीदेखील खूप आहे तिथल्या लोकांजवळ. हे लोक आहेत जातीने गोंड. ही मंडळी चांगली शूर-वीर अन् लढवय्यी आहेत. त्यांचा राजाही गोंड जातीचाच आहे. पण एक गोष्ट आहे

त्यांच्याबाबतीत. राणी दुर्गावतीची हुकमत ह्या मंडळींना मंजूर नाही. लांजीच्या राजानेच ही सारी हकीकत मला सांगितली. माझा चांगला स्नेह आहे त्यांच्याशी.'

'आमच्या बाजूचा होईल तो ? तुम्ही वळवू शकाल त्याचे मन आपल्या बाजूला ?'

बादशहा अकबराने प्रश्न विचारला खरा; पण तो स्वतःच काहीसा घुटमळला. क्षणभर त्याने महंत गोपानंदाकडे पाहिले. बादशहा आणखी काय विचारणार, ह्या अपेक्षेने महंत बादशहा-कडे पाहात होता.

'अन् हे पाहा महंत, तो नाही आपल्याकडे वळला तरी हरकत नाही. पण एक मात्र जरूर करा. तुमच्या ह्या राणी दुर्गावतीकडे नीट लक्ष ठेवा.'

'जहाँपनाह, लांजीचे गोंड आसपासच्याच लोकांबरोबरच नेहमी लढत असतात. खाविंदांची फौज त्यांना सहज दाबून टाकू शकेल. पण तशी वेळ मी येऊ देणार नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा करून मी ह्या लांजीच्या गोंड राजाला आपल्या बाजूला वळवीन.'

'ठीक आहे महंत, आणखी काही?' बादशहाने विचारले.

'जहाँपनाह, ह्या पामराची सेवा आपल्या चरणी व्यवस्थित रुजू व्हावी, एकढीच विनंती.'

महंताने बघता बघता हात जोडले नि बादशहा त्याला काय सुचवायचे होते ते पटकन् समजला. आशय समजताच बादशहाने त्याच्याकडे पाहून स्मित केले.

'महंत, आपल्याला कबूल केल्याप्रमाणे बिहार, गोंडवन जिथे मागाल तिथे जहागीर देऊ. इतकेच काय आपल्याला सारेजण 'राजामहाराजा' म्हणून समजतील, अशी आम्ही व्यवस्था करू.'

महंत गोपानंद हर्षभरीत झाला. वाकविता येईल तितके आपले शरीर खाली वाकवून त्याने बादशहाला नमस्कार केला. त्याच्या नमस्काराचा स्वीकार करीत असतानाच बादशहाने त्याला काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्याला कोणत्या प्रकारचे काम असफखानाबरोबर करावयाचे आहे त्याचे मार्गदर्शन केले.

अन् त्यानंतर दोन तीन दिवसांनीच महंत गोपानंद गोंडवनाच्या दिशेने निघून गेला.

• •

## प्रकरण : ७

बादशहा अकबराच्या ह्या प्रवासाचे वृत्त गढाला येऊन पोहोचावयास फारसा वेळ लागला नाही. बादशहाने यात्रेकरूंवर बसविला जाणारा जिजीया कर माफ केल्याची बातमीदेखील त्या पाठोपाठ येऊन थडकली. अन् हे सारे कुणा एका महंताने विनंती केल्यावर घडले होते.

'गोंडवनावर आक्रमण करावयाचे आहे म्हणूनच बादशहाने ही पूर्व तयारी चालवली असावी; अशी शंका महाराणी दुर्गावतीच्या मनाला चाटून गेली. हे केव्हातरी घडणारच आहे, ह्याची तिने अगोदरच कल्पना बांधलेली असल्यामुळे बादशहाच्या आक्रमणाला तोंड द्यावयाची तिची तयारी किती तरी आधीपासून चालू होती. आता तर तिने आपल्या अंकित राजांना नि सरदारांना सावधगिरीच्या सूचना देण्यास सुरुवात केली. गोंडवनाच्या चारही बाजू शत्रूच्या सैनिकांना मोकळ्या होत्या. खरे तर त्या बाजूंना शत्रूच्याच सीमा खेटल्या होत्या. साहजिकच महाराणीला आपल्या-

जवळ असलेले सैन्य ह्या चारही सीमांवर विखरून ठेवणे भाग पडले. पूर्व, पश्चिम अन् दक्षिण भागात असलेल्या किल्ल्यांच्या संरक्षणाची योजना आखण्यात आली अन् मगच ती सिंगोरगडावर परतली. ती परत आली तेव्हा तिला राहून राहून एकच वाटत होते–आपल्याला पूर्व, पश्चिम नि दक्षिण ह्या भागातच खास करून लक्ष द्यावे लागेल युद्ध पेटावयाचे असेल तर ते तिकडे पेटेल.

सिंगोरगडावर थोडका मुक्काम करून महाराणी दमोह्ला आली. तिच्या ह्या भेटीचा हेतू अर्थातच दुसरा होता. तिच्या हत्तीचा माहूत गणू दमोह्चा. नुकतेच त्याच्या पित्याचे निधन झाले होते.

नुकताच पावसाळा संपला होता. लोक दसऱ्याचा उत्सव



साजरा करण्यात मग्न होते. महाराणीची स्वारी दुपारच्या

दुसऱ्या प्रहरी दमोहच्या मार्गावरील एका जंगली भागातून चालली होती. सहजगत्या एका झाडाखाली बसलेल्या आठ-दहा वर्षांच्या बालकाकडे महाराणीचे लक्ष गेले. जातीनें गोंड असलेल्या त्या मुलाच्या हातात धनुष्य होते नि पाठीवरील भात्यात लोखंडाचे बाण होतें. त्याच्या एका पायातून रक्ताची धार लागली होती. महाराणीला समोरून येताना पाहताच त्याने चटकन् दोनही हात जोडून तिला नमस्कार केला. महाराणीला काय वाटले कुणास ठाऊक! तिने पुढे जाणारी स्वारी रोखली अन् त्या मुलाला जवळ बोलावून घेतले.

'बाळ, तुझ्या पायाला काय लागले?'

तिच्या शब्दात ममता होती. वात्सल्य होतें. मुलाला ते जाणवले. महाराणीविषयी त्याच्या आदराला सीमा राहिली नाही. तो प्रसन्नपणे हसला तेव्हा सावळ्या मेघातून चांदणी लकाकून गेल्याचा महाराणीला भास झाला.

'अं? तसे काही नाही. शिकार खेळताना बारीकशी जखम झालीय्.' मुलाने न कचरता उत्तर दिले.

'शिकार? कसली शिकार?'

'ह्या पेटीत ठेवलेल्या पाखराची!'

बोलता बोलता त्याने आपल्या जवळची एक छानदार पेटी महाराणीसमोर धरली.

'अरे वा! छान! पण ही जखम कशी झाली; ते नाही सांगितलेस'

अन् मग त्या मुलाने शिकार करता करता आपण जंगलात कसे शिरलो अन् तिथे लाकडे तोडणाऱ्या माणसाच्या हातून कुऱ्हाड कशी सुटली अन् ती आपल्या पायावर कशी पडली

त्या साऱ्याचे वर्णन केले. अन् तेही अगदी हसत हसत! महाराणीला त्याच्या बेडरपणाचे कौतुक वाटले. त्याला आवडेल अशी एक भेट देऊन ती पुढल्या मार्गाला लागली. पुढे जाताना लाखदा तिच्या मनात येऊन गेले– 'किती बेडर वृत्ती! एवढे रक्त वाहात असूनही त्याच्या मुखावरले हास्य काही लोपले नाही! ..अखेर कितीही झाले तरी तो आमच्याच गोंड जातीचा!! आमचे सत्पुत्र असे धीरवीर आहेत; म्हणूनच आमचे भवितव्य उजळ आहे...ह्यांच्या हितासाठीच आम्हाला झटले पाहिजे.'

मार्गावर तिला कसदार काळी जमीन पाहावयास मिळाली. त्या शेतातून नांगर फिरवावयाचे काम चार साधू करीत होते. आपल्या खांद्यावर नांगराचे जूं घेऊन त्यांचे काम चालू होते. बाजूलाच एक गोंड तरुण उभा होता. ते सारे दृश्य पाहता पाहता महाराणीला आश्चर्य वाटले. स्वारी थांबविण्याची तिने सूचना केली. अन् पटकन् हत्ती पुढे घेऊन ती गोंड तरुणाच्या जवळ जाऊन उभी राहिली. तिला तशी उभी राहिलेली पाहाताच त्या तरुणाने तिला विनयाने नमस्कार केला.

'महाराणी, कितीही सांगितले तरी हे पुण्यवंत माझे ऐकतच नाहीत.'

तरुणाचे ते वाक्य ऐकताच साधूंनी झटकन् आपले काम थांबविले, अन् महाराणीकडे वळून पाहिले.

तरुण सांगत होता,

'सरकार, खरे म्हणजे मी गाई जोडूनच नांगर चालविणार होतो. पण हे साधूपण हट्टालाच पेटले. आम्हीच नांगर चालविणार म्हणून थटून बसले. बैल नसले तर गाई जोडूनच नांगरणी करावयाची ही आमच्याकडली जुनी रीत. माझ्याजवळच्या गाई दूध

देत नाहीत. म्हणूनच मी त्यांना नांगराला जोडतो. ह्यात महाराणी, माझी चूक काय? ही मंडळी हत्तीवरून इथे आली अन् खाली उतरली. मला ह्यांनी धमकाविले आणि नांगराला जोडलेल्या गाईंना सोडून देऊन ह्यांनी जू आपल्या खांद्यावर घेतले. मघापासून ह्यांना विनंती करतो आहे की, आपण असे करू नका. पण माझे ऐकायलाच ते तयार नाहीत. साधू सज्जन असल्यामुळे ह्यांच्या-वर तीर-तलवार चालविणेदेखील शक्य नाही. सांगा, महाराणी मी काय करू ?'

महाराणीने एकदा जू खांद्यावर घेतलेल्या साधूंकडे पाहिले. अजूनही ते तिच्याकडे निरखून पाहात होते.

'आपण जू खाली उतरून ठेवा नि माझ्याशी बोला.'

महाराणीने अतिशय विनयाने विनंती केली. विनंती करता करता हत्ती खाली बसविण्याची तिने माहूताला सूचना केली. अन् हत्ती खाली बसविताच ती खाली उतरली. साधूनी खांद्यावरले जू उतरवून ठेवले अन् ते महाराणी जवळ येऊन उभे राहिले. गोंड तरुणही जवळ आला. साधूंचा पुढारी दूर उभा राहून हे सारे पाहात होता. तोही पुढे आला एक क्षण तिने साऱ्यांना निरखून पाहिले. अन् तिच्या कपाळावर आठ्यांचे जाळे विणले गेले. साधू तिच्या-कडे आदराने पाहात उभे होते. त्यांच्याकडे बघता बघता तिने त्यांना वाकून नमस्कार केला. साधूंनी तिला तोंडभरून आशीर्वाद दिले.

'आपल्या दर्शनाने आम्ही पावन झालो.' तिने म्हटले.

'महाराणी, गेली चार-पाच वर्षे आम्ही यात्रा करीत आहो. आमची जमातही आमच्याबरोबर असते. मला वाटते, आपली मागे एकदा भेट झाली होती माझे नाव महंत गोपानंद.' साधूंच्या पुढाऱ्या-ने खुलासा केला.

कफनी अंगावर चढविलेल्या त्या साधूकडे महाराणीने पुन्हा एकदा नजर टाकली.

'युवराज वीरनारायण अन् आपले दिवाण आधारसिंह खुशाल आहेत ना, महाराणी ?'

महंत गोपानंदाने गोड शब्दात चवकशी केली.

'आपल्या कृपेने सारे काही ठीक आहे. पण...पण आपल्या-बरोबरची आपली जमात कुठे आहे नि आपण हे इथे काय आरंभिले आहे ?' महाराणीने विचारले.

'मी विनंती केली; पण उलट मलाच धमक्या देऊन ह्यांनी नांगर खांद्यावर धरला.' गोंड तरुणाने पुन्हा खुलासा केला.

'बाबा, आम्ही तुला जरासुद्धा धमकी दिली नाही की भेडसवून सोडले नाही. गोमातेचे रक्षण आपणच केले पाहिजे; कशाही परिस्थितीत आपण तिला त्रास देता कामा नये, इतकेच आम्ही तुला सांगतो आहो.' महंताने शक्यतितक्या मृदु आवाजात म्हटले.

'हे पाहा. जेव्हा एखादा माणूस फिर्याद घेऊन येतो; तेव्हा त्याला असे वाढवून काहीतरी सांगावेच लागते. इथे ऐकणाऱ्याचे काम असते ते खरे शोधून काढण्याचे. सत्य पाहण्याचे. अन् फिर्यादीचे दुःख त्यानुसार दूर करण्याचे.' महाराणीने म्हटले.

बोलता बोलता तिने महंताकडे पाहिले नि मग पुढे म्हटले, 'मी विचारले, आपली जमात कुठे आहे ? अन् हे सारे तुम्ही का करता आहात ?'

'सारे सांगतो, महाराणी. गोरक्षा करणे अन् आपली सेवा करणे, ह्याच उद्देशाने आम्ही इथे आलो आहोत. गाईवर होणारा हा असला अत्याचार आम्हाला सहन होत नाही. ही मंडळी सरळ-सरळ सांगून आमचे म्हणणे मानीत नाहीत; तेव्हा मग नाईलाजाने

नांगराचे जू आम्हाला असे मानेवर घ्यावे लागते. अनेक ठिकाणी आम्हाला हा प्रकार करावा लागला. आम्हाला असे मनापासून वाटते की, निदान आमच्या ह्या कृतीचा तरी ह्यांच्या मनावर काही परिणाम होईल. कसेही का होईना, ह्यांना पटले म्हणजे झाले.' महंताने एका दमात सांगून टाकले.

'महंतजी,' दुर्गावतीने म्हटले, 'गोरक्षा करावी, असे मलाही वाटते. पण त्यासाठी हा मार्ग नाही. तुम्ही तो सोडून द्या नि मी सांगते ते लक्षात ठेवा. परकी आक्रमणापासून गोंडवनाची सुटका झाली रे झाली की, नांगरणीसाठी बैलांनाच लावले जाईल, ह्याची जातीने काळजी घेतली जाईल. गाईंना नांगराला जुंपणे कायद्यानें बंद केले जाईल.'

बोलता बोलता ती क्षणभर थांबली. तिने एक आवंढा गिळला.

'माझी एक विनंती आहे महंतजी. आपण सिंगोरगडावर जाऊन आराम करावा. युवराज वीर नारायण तिथेच आहेत. ते आपले योग्य स्वागत करतील.'

'आपल्या आज्ञेचे पालन करण्यात आम्हाला आनंदच वाटेल, महाराणी. अन्...अन् आपल्यावर आमचा पूर्ण भरंवसाही आहे. आपण जे बोलाल; ते जरूर करून दाखवाल. पण तरीही आपल्या चरणाशी एक प्रार्थना करीत आहे. महाराणीनी आम्हाला आपल्या बरोबर ठेवावे. आपल्याशी आम्हाला काही बातचीत करावयाची आहे. मला वाटते, महाराणी दुरच्या प्रवासाला निघालेल्या दिसतात. तेव्हा त्यांचे परत येणे कधी होईल; कुणास ठाऊक!' अतिशय विनयशील शब्दात महंत गोपानंदाने म्हटले,

'आम्ही आता गढ्याला निघालो आहोत. तिथले काम आटोपून मग पहरागडला नि शहागडाला जाणार आहोत. केव्हा पर

फिरू ते आताच नाही सांगता येणार. आपल्याला काही सांगायचे का?' महाराणीने चवकशी केली.

'महाराणींनी मनियागडाला जाऊ नये, असे आपले आम्हाला वाटते.' महंताने म्हटले.

अन् एकदम महाराणीच्या नजरेसमोरून मनियागडावरली अनेक दृश्ये सरून गेली तिने एक दीर्घ सुस्कारा सोडला अन् थोडा वेळ ती गप्प उभी राहिली. मग तिने त्या गोंड तरुणाकडे पाहिले.

'जा. तुझ्या इच्छेला येईल; तसे तुझे शेतीचे काम कर. लवकरच तुम्हा किसानांना सरकारातून नांगरणीसाठी बैल देण्यात येतील. तोवर चाललेय् तसे चालू द्या. बाहेर आक्रमकाचे चाळे चालू असताना आम्हाला ह्यात लक्ष घालून चालणार नाही.' महाराणीने म्हटले.

'गोंडवनासाठी मरावयास आम्ही सारे तयार आहोत, महाराणी.'

गोंड तरुणाने महाराणीला वचन दिले नि डोळ्याचे पाते लवते लवते तोच तो निघूनही गेला.

गोंड तरुण निघून गेल्यावर तिने पुन्हा एकदा महंताकडे पाहिले.

'आम्हाला पुरतेपणी ठाऊक आहे की, मनियागडावर रेवाच्या महाराजांची नजर आहे. म्हणूनच आम्ही आमचे काही सैन्य गडाच्या रक्षणासाठी तिथे ठेवले आहे. त्यांच्या जोडीला आणखीही सैन्य पाठवावयाचा आमचा विचार चालू आहे. एक मात्र खरे की, आजच आम्ही तिकडे जात नाही.' महाराणीने खुलासा केला.

'महाराणी, मी पुन्हा हात जोडून सांगतो. आपण मनियागडावर जाऊ नये. उलट तिथे असलेले आपले सैन्यही आपण काढून

घ्यावे.' महंताने विनंती केली.

'नाही. ते शक्य नाही. महाराणीने निश्चयाचे उत्तर दिले.

'ठीक आहे, महाराणी, आपल्याला जसे योग्य वाटेल तसे करावे. पण आम्हाला मात्र असे जरूर वाटते की, यदाकदाचित् अकबराच्या सैन्याचे गोंडवनावर आक्रमण झालेच तर ते मनिया-गडाकडूनच होईल.'

सूचना देता देता महंत मधेच थांबला. महाराणीला उभे असलेली पाहून त्याला चमत्कारिक वाटले.

'जाऊ द्या. उगाचच आमच्यापायी आपल्याला उभे राहावे लागले. आम्ही सवडीने केव्हातरी ह्या बादशहा अकबराच्या गोष्टी आपल्याला ऐकवू. प्रयागास जाणाऱ्या यात्रेकरूंवरचा कर उठवावा, ही माझी विनंती बादशहाने मानली असली तरी एका वेगळ्याच कारणासाठी तो आमच्यावर चांगलाच रुष्ट झाला. पण ते का; ते मी महाराणींना केव्हा तरी जरूर सांगेन बादशहा त्या वेळी एवढा रागावला होता की, त्याचा त्या वेळचा एकूण अवतार पाहून आम्हाला वाटले–आता हा आमचा कडेलोटच करणार.'

महंत गोपानंद सांगत असताना महाराणीला त्याची नि त्याच्या साथीदारांची करुणा आली. तिने त्याला आपल्याबरोबर राहण्याची अनुज्ञा दिली. महंतानेही मोठ्या गोड शब्दांनी महा-राणीचे मन आपल्याकडे वळवून घेतले अन् तिला बादशहाबद्दल बनावट बातम्या तिखटमीठ लावून सांगितल्या. साऱ्या प्रवासभर त्या बातम्यांनी तिची चांगलीच सोबत केली.

महाराणी दुर्गावतीचा ह्या साऱ्या भाकडकथा ऐकून एकच फायदा झाला. बादशहा अकबराच्या स्वभावाचा तिला पुरेपूर परिचय झाला.

● ●

## प्रकरण : ८

दिवसामागून दिवस झरझर सरत होते. अन् एक दिवस कार्तिकी पौर्णिमा उगवली. दुर्गावतीने अन् युवराज वीरनारायणाने गडावरल्या एका कुंडावर स्नान केले. त्यानंतर थोडा दानधर्मही केला. महंत गोपानंद अन् त्याचे तीन साथीदार गडाखालच्या एका खंदकातून बाहेर पडले नि तिथून थोड्या अंतरावर असलेल्या नदीच्या काठी जाऊन बसले. नदीचे पात्र चांगलेच विस्तृत होते. पाणी खोल होते. किनाऱ्याच्या दोनही बाजूंना असलेली पर्वतराजी सरळ वर चढत गेली होती. वर सुळक्यापर्यंत सरळ गेल्यावर तिला दोन फाटे फुटले होते. महंत गोपानंद खूप वेळ तिकडे नुसताच पाहात राहिला होता.

'वरून इथून सेना सहज खाली उतरू शकेल अन् खंदक पार करून किल्ल्यात शिरू शकेल.'

महंत गोपानंदने आपली कल्पना बोलून दाखविली.

हत्तीद्वारापर्यंत पोहोचावयास तिला काहीसे कठीणच जाईल.' एकाने शंका व्यक्त केली.

'जो घाव घालावयास जाईल; त्याला कसूनच लढावे लागेल.'

'नक्कीच.'

'एक आहे. इथले जंगल चांगलेच दाट आहे. त्यामुळे लपून बसावयाची सोय चांगली आहे.'

हऱ्या जंगलातून हिंस्र जनावरे देखील खूप आहेत. तेव्हा असे झाले पाहिजे—राणी शिकारीसाठी इकडे आली पाहिजे अन् ह्या जंगली जनावरांकडून तिचा फडशा पडला पाहिजे.' एकाने आपल्या मनातले बोलून दाखविले.

'छे. छे. असे होऊन नाही चालणार. असे होऊ देता उपयोगी नाही.'

बोलता बोलता महंत गोपानंद कपडे उतरू लागला. त्याने आपल्या तीन साथीदारांकडे पाहिले. काहीतरी अपेक्षेने ते त्याच्याकडे पाहात होते.

'मी आता स्नानाला बसतोय्. तोवर तुम्ही दूर जाऊन बसा.'

'ठिक आहे.'



महंताकडून सूचना मिळताच तिघेही दूर जाऊन बसले. महंत गोपानंद नदिच्या पात्रात उतरला नि मनसोक्त स्नान करून झाल्यावर बाहेर आला. झटपट कपडे बदलून त्याने मग आपल्या तिघा साथीदारांना बोलावून घेतले. महंता पाठोपाठ त्यांनीही स्नान

केले नि मग पुन्हा खंदकातून बाहेर पडून सारेजण परत गडावर आले. गडावर त्यांची वाट पहात पहारेकरी उभाच होता.

'महंतजी, महाराणींनी आपल्याला बोलावले आहे. वर दानधर्म चालू आहे.' पहारेकऱ्याने महाराणीचा निरोप दिला.

महाराणी दुर्गावतीच्या महालात चौघांनी प्रवेश केला तेव्हा दुपार टळून चालली होती महालात एक छोटासा दरबारच भरला होता. दोन वेगवेगळ्या उच्च आसनावर महाराणी अन् युवराज वीर नारायण बसले होते. बाजूलाच पंडित महेश ठाकूर नि त्याचा शिष्य रघुनंदन बसले होते. आसनांच्या दोनही बाजूला अनेक सरदार आपापल्या मानाप्रमाणे स्थानापन्न झाले होते. त्या छोट्याशा दरबारातील एक आसन अजूनही रिकामेच होते. महंताला त्याच्या शिष्यांसह आत आलेले पाहताच महाराणीने नि युवराजाने उठून त्यांना प्रणाम केला. अन् त्या रिकाम्या आसनांवर बसण्यास त्यांना सुचविले. वर हात उंचावून महंत गोपानंदाने त्यांना आशीर्वाद दिला अन् तो रिकाम्या आसनावर जाऊन बसला. महंताला बसलेला पाहताच त्याचे तिघेही शिष्य सरदारांच्या पंक्तीत जाऊन बसले. नुकतेच पंडित महेश ठाकूरने आपले कथावाचन संपविले होते अवांतर गोष्टीवरच दरबारात चर्चा चालू होती.

महंत गोपानंदाने बसल्या जागेवरून एकदा महाराणी दुर्गावतीकडे पाहिले नि चटकन् आपली नजर खाली वळविली. महाराणीच्या गोऱ्यापान टवटवीत चेहऱ्यावर शांती नि सौंदर्य ह्यांचे विलक्षण मिश्रण भरून-पसरून राहिले होते. कपाळावर लाविलेल्या चंदनाच्या टिळ्यामुळे एक प्रकारची भव्यता आलेली होती. महंताला वाटले, 'आपण एका अलौकिक देवतेचे दर्शन घेत आहो.' स्वतःच्या ह्या कल्पनेच्या भरात तो कितीतरी वेळ विचार करीत राहिला.

'आज आपल्याला लढावे लागणार आहे, ते आपल्या धर्मासाठी. म्हणूनच युद्धात आपल्याला कुठल्याही प्रकारची कसूर करून चालणार नाही. परिणाम काय होईल–जय मिळेल की, पराभव पत्करावा लागेल– ह्याकडे बघून चालावयाचे नाही. ते काम आपण परमेश्वरावरच सोपवू.'

महाराणी दुर्गावतीचा धीरगंभीर आवाज साऱ्या महालभर घुमत राहिला. सरदारांची नि दरबारी लोकांची मने त्या आवाजामुळे थरारून उठली.

'होय, महाराणी ह्या धर्मयुद्धात आमचा जयच होणार.' पंडित महेश ठाकूरचा उंच आवाज उठला.

हात वर उंचावून महंतानेही मग साथ दिली.

'महंतजी, आपले दुसरे दोन दूत थोड्याच वेळापूर्वी इथे येऊन दाखल झाले आहेत. त्यांच्याकडून आम्हाला खबर मिळालीय् की बादशहा अकबर दिल्लीच्या रोखाने परतत आहे. अन् असफखानाच्या फौजेने मनियागडचा ताबा घेतला आहे. तिथे मजबूत पाय रोवून कदाचित् तो शहागडाकडून पुढे सरकेल किंवा दुसऱ्याही कुठल्या मार्गाने तो येईल, तो नेमके काय करील, हे आजच सांगता येणार नाही' युवराज वीरनारायणने स्वत:जवळ असलेली माहिती दिली.

'युवराज कुठे आहेत ते दोघे?' महंताने विचारले.

'आताच स्नानासाठी म्हणून गेले आहेत. खूप वेळ वाट पाहिली त्यांनी तुमची'

'महंतजी, ह्या असफखानाचे लक्षण काही ठीक दिसत नाही मला. एक तर तो ह्या धर्मयुद्धात मारला जाईल, नाहीतर महाराणीच्या कैदेत तरी खितपत पडेल.' मोठ्या उत्साहाच्या भरात

महेश ठाकूरने म्हटले.

'मग काय होईल ?'

'कैदेत पडला; तर त्या राक्षसाचे हालहाल केले जातील अन् मगच त्याला खतम् करण्यात येईल.' न राहवून रघुनंदनने मधेच उत्तर दिले.

'हे शक्य नाही ' महाराणीने ठामपणे म्हटले, 'आम्ही तसे घडू देणार नाही. नीच माणसाबरोबर नीच व्हायची आमची तयारी नाही. आमच्या धर्माच्या सर्वस्वी विरुद्ध आहे ते ! चंदेरीचा मेदिनीराय त्याचे वर्तन आपण डोळयांपुढे ठेवले पाहिजे आपला शेजारी होता तो. माळव्याच्या सुलतानाशी तो प्राणपणाने लढला. त्याने युद्धात त्याला हरवले, कैद केले. पण अखेर त्याला सारे विसरून जाऊन मोठ्या मनाने सोडूनही दिले. नुसतेच सोडून दिले नाही तर शिष्टाचार सांभाळून अन् त्याचे पूर्वीचे वैभव त्याला परत देऊन सोडले.'

महाराणी कहाणी सांगता सांगता एकदम थांबली. दरबारातून 'वाहवा'चा आदरायुक्त आवाज उठला. रघुनंदनने आपले मस्तक आदराने खाली झुकविले. महंत गोपानंद मात्र ह्यापैकी काहीच न करता सून्न होऊन नुसता विचार करीत होता.

दरबारात मग एकातून एक विषय निघू लागले. अन् रंगू लागले. त्या साऱ्या चर्चेतून भाग घेता घेता पुण्यदान करण्याचे महाराणीचे काम एकीकडे चालूच होते. दान घेणारे मिळालेल्या दानाने संतुष्ट होत होते होता होता महंत गोपानंदाचीही पाळी आली. दान म्हणून महाराणीने त्याला एक उत्तम हत्ती अन् थोडेसे सुवर्ण दिले. तृप्त मनाने सारेजण महाराणीला आशीर्वाद देत होते.

दान देऊन झाल्यावर महाराणीने महंताला सहजपणे म्हटले, 'महंतजी, बादशहा अकबराने आपला अपमान केला. नाही का?'

'हुं!'

'आपण महंत असूनही कुठल्याच गादीचे धनी नाहीत?' महाराणीने पुन्हा विचारले.

'होय, महाराणीजी.'

महंताच्या चेहऱ्यावर खेदाची छटा पसरली.

'महंतजी, म्हणूनच आम्ही ठरविलेय् की, ह्या युद्धात विजय झाला तर तुम्हाला एक फार मोठी जहागीर द्यायची.'

महंत हसला. त्याच्या चेहऱ्यावरली खेदाची रेषा हलकेच पुसली गेली. त्याने आपला उजवा हात वर केला.

'महाराणींचे कल्याण असो!'

महंताने आशीर्वाद दिला.

महंताच्या आशीर्वादाचा हसतमुखाने स्वीकार करीत महाराणीने महेश ठाकूर व इतरांकडे पाहिले.

'आता आपण सारे आपल्या घरी जा ह्यापुढली आपली भेट युद्ध समाप्त झाल्यावरच. युद्ध हेच आता आमचे पहिले कर्तव्य. त्यात विजय मिळवायचा; नाहीतर मिटून जायचे. बस्स! दुसरे काही नाही!'

महाराणीने सगळ्यांकडे पाहात हलकेच स्मित हास्य केले. महेश ठाकूरला महाराणीच्या घोषणेने विशेष आनंद झालेला दिसला. पण तो क्षणभरच. कारण दुसऱ्याच क्षणाला त्याचा चेहरा खेदाच्या भावनेने फुलून आला. डोळ्यांच्या कडा बघता बघता ओलसर झाल्या.

'आम्हालाही रणविद्या अवगत असती तर, महाराणी, आम्हीही आमच्या देशासाठी लढलो असतो.' महेश ठाकूरने रडवेल्या सुरात म्हटले.

'पंडितजी, तुम्हाला जे काही येतेय, तेही काही कमी नाही. तुमच्या कथावाचनाचा उपयोग करून जनतेला पेटून उठवा नि तिचे जरूर पडेल तेथे सांत्वनही करा. हे कामही कुणीतरी करायलाच हवे. त्यासाठी आवश्यक असलेला वेळ आमच्यापाशी बिल्कुल नाही.'

महाराणीने महेश ठाकूरचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. तिच्या शब्दात समजावणीचा सूर होता. त्याची जाणीव होताच महेश ठाकूरला खूप बरे वाटले. हलके हलके वाटू लागले.

ठिकठिकाणच्या आमच्या सरदारात अन् मांडलीक राजांमध्ये विलक्षण सुस्तपणा भरला आहे. आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ कसे होऊ; वरचढ कसे होऊ; ह्याचीच त्यांना चिंता लागून राहिलेली दिसतेय्. पुऱ्या राज्याचा धनीच प्रबल झालेला दिसला तरच ते त्याला साथ देतात. नाहीतर स्वस्थ बसून राहतात. ह्याचा परिणाम असा झालाय् की, त्यांच्या प्रजेत दुबळेपणा येत चाललाय्. पाणी नि तेल जसे एकत्र केले तरी वेगवेगळेच राहते तसे काहीसे झालेय राजाचे नि त्यांच्या प्रजेचे! जनता म्हणते, राजे येतात, जातात दुसरे येतात. आम्हाला काय त्याचे!'

युवराज वीरनारायणाने गंभीरपणे सांगण्यास सुरुवात केली. पण महाराणी दुर्गावतीने डोळ्यांनी इशारा दिला तेव्हा त्याला गप्प बसावेच लागले. तसे झाले नसते तर तो आणखीदेखील खूपसे काही बोलणार होता.

दुर्गावतीने म्हटले, 'आमच्या गोंडवनातील परिस्थिती मात्र

अगदी वेगळी आहे. आमचे सारे राजे-रजवाडे आमच्याबरोबर आहेत. आमच्याबरोबरच राहणार आहेत.'

दरबारातील मानकऱ्यांनी समाधानाने माना डोलाविल्या.

खूप वेळ निरनिराळ्या विषयावर चर्चा झाली अन् दरबार उठावयाची वेळ भरत आली. दरबारी मंडळी एकेक करून उठू लागली होती.

'महाराणीजी, नदीच्या काठी गुंफात आहेत. तिथे आमचे गुरुदेव योग-तपस्या करीत आहेत. आम्ही आता त्यांच्या दर्शनासाठी जात आहोत कदाचित् ते तिथे नसतील. त्यांचा ठावठिकाणा धुंडीत आम्हाला बराच प्रवासही करावा लागेल. पण ते काही असो. आम्हाला त्यांचे दर्शन घडले रे घडले की, तावडतोब आम्ही इकडे परतू. तोवर आम्हाला अनुज्ञा असावी.'

उठता उठता महंत गोपानंदाने हात जोडीत जाण्यासाठी महाराणीजवळ परवानगी मागितली. महाराणी ती विनंती ऐकत असताना किंचित् विचारात पडली.

पण क्षणभर! मग तिने स्वतःला सावरले. महंताकडे एकवार नीट लक्षपूर्वक पाहिले.

'महंतजी, मला अंधुक अंधुक आठवतेय्. चौदा-पंधरा वर्षांपूर्वी आपले दर्शन कुठेतरी झाले होते. कुठे, तेवढे मात्र नक्की आठवत नाही ' महाराणीने म्हटले.

'जी महाराणी. मलाही तसेच वाटतेय्.'

'तुम्ही इकडे परत केव्हा याल?'

'नक्की काहीच सांगता येणार नाही पण शक्य तितक्या लवकर परत येण्याचा प्रयत्न करू. तरीही मला वाटते, एक महिना दोन महिने तरी जरूर लागतील.'

'महंतजी, आमची एक सूचना आहे.'

'कसली ?'

'जाताना आम्ही दान दिलेला हत्तीही आपण बरोबर घेऊन जावा.'

'महाराणी, सध्याच आमच्याजवळ एक हत्ती आहे. तोच नुसता पोसावयास लागतो. आणखी हा एक बरोबर बाळगून काय करायचे ? एक आहे तेवढा पुरे ! अन् आम्ही आहोत तरी कितीजण ! पाचजण अवघे. एवढ्याशा छोट्या तांड्याला इतका मोठा लवाजमा कशासाठी हवा.' महंताने दीर्घ खुलासा केला.

'ठीक आहे, महंतजी. जशी आपली मर्जी !'

महाराणीला आशीर्वाद देऊन महंत गोपानंदाने तिचा निरोप घेतला. आपल्या शिष्यांना बरोबर घेऊन तो पुढल्या प्रवासाला निघाला. प्रवासाला निघण्यापूर्वी त्याचे दोन शिष्य त्याला येऊन भेटले. त्यांच्यामध्ये कसलीशी चर्चा झाली.

'नबाब असफखानाबरोबर आमची भेट झाली होती. त्यांना आम्ही सारी माहिती दिली आहे. सूचनाही केल्या आहेत. सिंगोरगडावर एकच तोफ आहे अन् तीही छोटीशी. बाकी थोड्या बंदुका नि उरलेल्या तीर तलवारी असल्याची माहिती आम्ही न चुकता त्यांच्या कानांवर घातलीय्. तोफ कुठल्या बुरुजावर ठेवलेली आहे तेही सांगावयास आम्ही विसरलो नाही.'

दोघांनी आल्या आल्या एका दमात महंताला एवढी माहिती पुरविली. एक क्षण उसंत घेत त्यांनी त्याच्याकडे पाहिले. महंत शांतपणे सारे ऐकून घेत उभा होता.

'आम्ही पुढे काय करावे ?'

दोघा शिष्यांनी महंताकडे चवकशी केली. महंताने त्या दिवशी

दरबारात जे काही घडले, त्याची माहिती दोघांनाही करून दिली. महाराणीने केलेल्या दानधर्माबद्दलचा तपशिलही सांगितला अन् मग म्हटले, 'आता सध्या तरी आपल्याला दुसरे कसलेच काम नाही. म्हणूनच कुठल्याही प्रकारे वेळ न दडवता आपल्या गुरुदेवांच्या दर्शनाला जावयाचे आहे. तशात आमचे मन ठिकाणावर नाही. ते सारखे कुठे तरी भटकते आहे. गुरुदेवांचे दर्शन झाले तर ते ताळ्यावर येईल नि त्या दर्शनाने आपल्याला फळही चांगले मिळेल.'

महंताचा शिष्यगण एकूण मामला ऐकून प्रसंन्न झाला. आपल्या गुरूच्या करामतीबद्दल त्यांना अपार कौतुक वाटले. 'असफखान हरला तर त्यांना महाराणीकडून जहागिरी मिळणार होती नि महाराणी पराभूत झाली तर बादशहाकडून उपहार लाभणार होता.' हीच भावना त्यांनी एकमेकात शब्दांनीही बोलून दाखविली नि आपला आनंद प्रकट केला.

बादशहाचा मला कसलाच भरंवसा वाटत नाहीसा 'झालाय्. आग्र्याला असताना त्याने म्हटलेन् लाखाची जहागिरी देतो. पण कड्याला आल्यावर त्याने आपले शब्द फिरविले. उत्तरे मिळाली ती उडवाउडवीची. ठीक आहे. आपले आपल्याला काम करावयास हवे.'

महंताच्या शब्दात खेदाची बारीकशी छटा होती. ती सर्वांना जाणवली. कुणीच कुणाशी बोलले नाही. सारेजण प्रवासाच्या तयारीत गढून गेले. अन् तयारी पुरी होताच सिंगोरगड सोडून ते बाहेर पडले. गौरनदीच्या तटावरील गुंफावर येऊन त्यांनी चवकशी केली तेव्हा त्यांना समजले की, त्यांचे गुरुदेव दक्षिणेकडील तीर्थांची यात्रा करण्यासाठी निघून गेले आहेत. निदान महिनाभर तरी येणार नाहीत. गुरुदेवांच्या तीर्थाटनाचे हे वृत्त ऐकून महंत गोपानंदाला

थोडेसे वाईट वाटले. त्याने तिथल्या तिथेच दक्षिणेकडे जावयाचा बेत जाहीर केला. 'पण गुरुदेवांना नक्की कुठे शोधायचे ह्याचा काहीच बोध होण्यासारखा नसल्यामुळे' शिष्यांनीच त्याच्या बेताला मोडता घातला. बेत फिरवून महंताने मग तिथेच गुरुदेवांची वाट पाहात मुक्काम करावयाचे ठरविले.

सिंगोरगड नि त्याच्या परिसरात कुठे काय घडतेय् ह्याबद्दलच्या हकीकती महंताला नियमीत मिळत होत्या. मनियागड सोडून हसफखानाची पुढली वाटचाल हळुहळू चालू झाली होती. दमोहकडे त्याने आपला मोर्चा वळविला होता. मार्गातील छोटी मोठी गावे लुटून, जाळपोळ करून त्याने हाहा:कार उडवला होता. दमोहच्या उत्तरेकडील पहाडी मुलखात मुक्काम पडेपर्यंत त्याने किती मुलूख उजाड केला होता कुणास ठाऊक! मार्गातील अनेक छोटे-छोटे गड त्याने ताब्यात घेतले होते. एक अतिशय सावध अन् चतुर सेनानायक असल्याचे असफखानाने सिद्ध केले होते.

पण महाराणी दुर्गावतीदेखील तितकीच सावध होती. पुढे यंत असलेल्या असफखानाला रोखण्यासाठी तिनेही आपले पाऊल उचलले होते. आपल्या सैन्याच्या छोटचा छोटचा तुकडचा बरोबर घेऊन ती दमोहच्या आसपासच्या भागात फिरू लागली. पण लवकरच तिच्या लक्षात आले की, 'फार काळ असे फिरत राहणे योग्य ठरणारे नाही' अन् मग ती लगेच माघारी वळली.

असफखानाच्या आक्रमणाला यशस्वी रीतीने तोंड देता यावे, म्हणून काय उपाय योजावयास हवेत; त्याचा सिंगोरगडावर येऊन तिने खोलवर विचार केला नि मगच त्या उपायांच्या अंमलबजावणीचे काम तिने हातात घेतले. युवराज वीरनारायण,

दिवाण आधारसिंह नि दरबारातील वृद्ध नि अनुभवी मानकरी मंडळी नि मांडलीक राजे ह्यांच्याबरोबर सतत तिच्या चर्चा झडू लागल्या. सावधगिरी म्हणून योजावयाच्या कुठल्याही उपायात उणीव राहू नये, म्हणून महाराणी अन् इतर दरबारी डोळ्यांत तेल घालून बसले होते !

• •

## प्रकरण : ९

हळुहळू चांगलीच थंडी पडू लागली होती. दक्षिण दिशेला असलेल्या तीर्थांच्या यात्रेला गेलेले महंत गोपानंदाचे गुरुदेव परत आले होते. आल्या दिवशीच त्यांनी मौनव्रत धारण केलेले असल्यामुळे महंतला त्यांच्याशी काही बोलता आले नाही. फक्त त्यांचे दर्शनच काय ते घडले! एरव्हीसुद्धा गुरुदेव फारच कमी बोलत; हे महंताला अनुभवाने ठाऊक झाले होते.

दुसऱ्या दिवशी गुरुदेवांचे मौन सुटले अन् घाईघाईने महंताने त्यांची भेट घेतली. त्यांच्या तीर्थयात्रेची चौकशी केली; प्रकृतीची विचारपूस झाली, इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्या. मग गुरुदेवांनीही त्याच्याबद्दल विचारपूस केली.

'गुरुदेव, अलीकडे अलीकडे मन फार चलबिचल झाले आहे. मला आशीर्वाद देऊन मार्गदर्शन करावे.'

महंताने गुरुदेवापुढे हात जोडले.

'ही काही नवी गोष्ट नाही बेटा. तुझे असे नेहमीच होते. मन स्थिर करण्याचा प्रयत्न करीत चल.'

'गुरुदेव, मला आपले आशीर्वाद तर हवेच. पण काही

उपदेशही हवा आहे.' महंताने पुन्हा विनंती केली.

'काम क्रोध काबूत ठेवण्याचा प्रयत्न कर. भलत्याच आशेच्या किंवा आकांक्षेच्या आहारी जाऊन फसू नकोस. अन् दुसरे काय सांगू. जे काय करशील ते वासुदेवाला साक्षी ठेवून करीत जा. बस्!'

गुरुदेवांच्या ह्या उपदेशाचा महंत किती तरी वेळ नुसता विचारच करीत राहिला. अन् मग एकदम त्याने स्वतःला सावरले. खाली मान घालून तो गुरुदेवांसमोर उभा राहिला.



'बेटा, आत्म्याचा प्रकाश कुठे मिळतो का, याचा तू जरूर शोध घे. केवळ हत्तींवर बसून फिरत राहू नकोस.'

यापेक्षा आणखी काही सांगावयाचे गुरुदेवांनी मनःपूर्वक

टाळले. आशीर्वादपर असा कुठलाच शब्द त्यांच्या तोंडून तेवढ्या वेळात निघालाच नाही! गुरुदेव चटकन् जागचे उठले नि आपल्या कामासाठी निघून गेले.

महंत गोपानंद गुरुदेवाच्या सहवासात काही दिवस राहिला. पण त्याचे मन काही स्थिर होऊ शकले नाही. एक दिवस आपल्याच मनाने एक अर्धाकच्चा निर्णय घेतला. त्याबद्दल आपल्या शिष्यांजवळ थोडकी चर्चाही केली. अन् आपला निर्णय कसा अचूक आहे, ह्याविषयी त्यांची खात्री पटवून देऊन तो आपल्या शिष्यगणासह सिंगोरगडाकडे निघाला. लढाईचे वातावरण सगळीकडे भरून राहिले होते. पावलापावलागणिक सावधान राहावे लागत होते. साहजिकच महंत नि त्यांच्या शिष्यवर्गाला जागजागी मुक्काम ठोकीत प्रवास करावा लागत होता.

महंत सिंगोरगडावर पोहोचला तेव्हा महाराणी निवडक सैन्य घेऊन दमोहला जाण्याच्या बेतात होती सैन्यात थोडे घोडेस्वार; थोडे हत्ती अन् बरेचसे पायदळ होते. महंताच्या आगमनाची बातमी समजताच महाराणीने त्याला भेटीचें आमंत्रण दिले अन् मग महंताला घाईने तिची भेट घ्यावीच लागली.

राजदरबारातील शिष्टाचार पाळल्यावर अन् कुशल प्रश्न विचारल्यावर महंताने सहजपणे विचारले, 'महाराणीजी, काय योजना आहे आपली? आपण कुठे निघाला आहात?'

'असफखानाने दमोहच्या उत्तरेकडल्या पहाडी भागात आपला मोर्चा लावला आहे. आमची काही सेना म्हणूनच ह्यापूर्वी तिकडे जाऊन थडकली आहे त्या सेनेला हुरूप यावा; मदत मिळावी म्हणून आज आम्ही जातीने तिकडे जात आहो.' महाराणीने खुलासा करीत म्हटले.

'युवराज वीरनारायणदेखील तिकडेच रवाना झाले आहेत का ?'

'नाही. सिंगोरगडाच्या रक्षणासाठी आम्ही त्यांना इकडेच ठेवणार आहोत.'

'मला वाटते, महाराणीजी, माझ्या शिष्यांपैकी एखाद्याला तरी आपण बरोबर घेऊन जावे. काही तरी उपयोग नक्कीच होईल त्याचा.'

'आत्ता नको महंतजी. जरूर भासेल तेव्हा आम्ही जरूर घेऊन जाऊ. आपण दूरवरून आलात. जरा आराम करा.'

महाराणीने सूचना केली.

अन् महंत गोपानंद आपल्या निवासस्थानी परत आला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी पहाट फुटण्यापूर्वी महाराणी दुर्गावती युद्धस्थळाकडे रवाना झाली.

दिवस वर चढत होता. महंत गोपानंद अन् त्यांचे शिष्य एकत्र झाले. त्यांच्यात चर्चा झाली.

'आपल्यापैकी काहीजणांना बातम्या मिळविण्यासाठी बाहेर राहावयास हवे.' चर्चेतून एक सूचना पुढे आली.

'मला वाटते काही दिवस आपण इथेच मुक्काम करावा, हे बरे.' अगदी हळू आवाजात गोपानंदाने सुचविले.

शिष्यांनी मग फारच आग्रह केला तेव्हा त्याने म्हटले, 'लढाई-चा एकूण परिणाम काय होतो, ते पाहूनच पुढला बेत ठरवावा; हे बरे.'

आपण नबाब असफखानाला निदान सुरंगाबद्दल आपल्या-जवळ असलेली खबर कसेही करून पोहचवावयास हवी.' शिष्यांनी आपले म्हणणे मांडले.

'ठीक आहे. ते बघता येईल.'

'आपला आदेश होईल, तसेच आम्ही वागत जाऊ, महंत-महाराज.'

'मला 'महाराज–बिहराज' असे काही म्हणू नका. नुसतेच 'महंत' म्हणा. अन् हे पाहा आणखी दोन दिवस वाट पाहा. महाराणीची काही खबर मिळू दे. मग बघू पुढे काय करायचे ते.'

'ठीक आहे. जशी आपली आज्ञा.'

महंत गोपानंदाबरोबरची चर्चा संपली नि आता त्यांचे कान महाराणीसंबंधी काय बातमी येते ते ऐकण्याकडे वळले.

सावधपणे पण तितक्याच वेगाने महाराणी दमोहच्या दिशेने पुढे सरकू लागली. अगोदर पुढे गेलेल्या तिच्या सेनेने एका छोटयाशा धुमःश्चक्रीत चांगलाच मार खाल्ला अन् तिला थोडे मागे हटावे लागले होते. आपल्याजवळच्या तोफा सुरक्षितपणे मागे ठेवून असफखान दमोहला येऊन थडकला. तरी देखील खुल्या मैदानात राणीच्या सैन्याशी मुकाबला करावयास त्याला धडपणे अजून जमलेले नव्हते. साहाजिकच पुढे पाऊल टाकताना तो फार काळजी घेत होता.

जवळपास पाचएकशे सैनिक महाराणीजवळ होते. तिने ते सारे पहाडी मुलखात पेरून ठेवले. जवळ असलेल्या थोडया घोडेस्वारांना बरोबर घेऊन असफखानाशी सामना करावयाचा, असा मनाशी बेत ठरवून ती निघाली. हत्तीस्वार मागेच राहिले घोडयावर स्वार होऊन ती स्वतःच आपल्या सैन्याचे मार्गदर्शन करू लागली. मार्ग बिकट होता. पण देशरक्षणापुढे त्याचे कुणालाच काही वाटत नव्हते. एका पर्वतश्रेणीच्या पायथ्याशी असफखानाच्या सेनेची नि तिच्या सेनेची गाठ पडली. लढाईला तोंड लागले. दोनही बाजूंनी तीरांचा मारा चालू झाला. मग त्यातच

भर म्हणून की काय, असफखानाच्या बाजूने बंदुकीच्या गोळ्या सुटू लागल्या. ह्या प्रचंड घणाघातापुढे आपला निभाव लागणार नाही, हे लक्षात येताच महाराणीने आपले सैन्य परत माघारी फिरविले. असफखानाला आनंद झाला. त्याला वाटले, राणीची सेना रणातून पळाली. तरीही त्याच्या घोडेस्वारांनी राणीच्या सैन्याचा पाठलाग केलाच. मोठ्या मुष्किलीने राणी त्यातून बचावली. तिने मागे वळून पाहिले. आजूबाजूला तिचे सैन्य कुठेच नव्हते होती ती फक्त पाठलागावर आलेली थोडीशी मोंगल सेना. पण ती सेनाही भांबावलेली होती. चारी बाजूंनी तिच्यावर तीराचा मारा होत होता. जणू पाऊसच पडत होता म्हणा ना! त्या वर्षावाने बरेच मोगल सैनिक गतप्राण झाले, तर खूपसे घायाळ झाले. उरलेल्यांना लळत-लोंबत आपल्या तळावर परत फिरावे लागले. त्यांची झालेली ती स्थिती पाहून असफखानाच्या लक्षात येऊन चुकले—आपली ज्याच्याशी गाठ पडली आहे, तो शत्रू काही लेचापेचा नाही. चांगला भारी आहे.

महाराणीला मिळालेल्या ह्या विजयाने मनापासून आनंद झाला होता तरी तितकेच दु:खही झाले होते. झालेल्या ह्या झटापटीत तिचे निष्ठावंत सैनिक तिला गमवावे लागले होते. उरलेल्या सैनिकांना बरोबर घेऊन मनाशी हे दु:ख जपत महाराणी सिंगोरगडावर परत फिरली. पण परत फिरण्यापूर्वी दमोहची मोर्चा बंदी व्यवस्थितपणे पुरी करावयास मात्र ती विसरली नाही.

सिंगोरगडावर परत आल्यावर लढाईत मृत झालेल्या सैनिकांचा मोठ्या इतमानाने अग्निसंस्कार केला. जखमी झालेल्यांवर उपचार केले. सैनिकांच्या घरोघर जाऊन त्यांच्या माणसांचे

स्वतः सांत्वनही महाराणीने केले. अन् हे सारे घडले तेव्हाच कुठे तिच्या मनाला थोडासा आराम वाटला.

महाराणीच्या पराक्रमाचे हे वृत्त समजावयास महंताला फार वेळ लागला नाही. त्याने मनाशी ठरविले की, 'शत्रूकडले रहस्य समजून घ्यावयास आपल्या शिष्यांना आता बाहेर पाठवावयासच हवे.' मनाशी विचार पक्का होताच त्याने आपले तीन शिष्य बाहेर पाठविले देखील ! आता मागे सिंगोरगडावर त्याच्या बरोबर केवळ दोनच शिष्य उरले.

● ●

## प्रकरण : १०

महाराणी दुर्गावतीच्या मुलखात ठाण मांडून बसलेल्या असफखानाशी महाराणीची लहान मोठी युद्धे आता वरचेवर होऊ लागली. त्यापैकी अनेक झटापटीत असफखानाच्या पदरी केवळ अपयशच आले. दरएक लढाईत त्याचे बरेचसे सैनिक कामी येऊ लागले. अन् तरीही तो मागे हटला नाही; हटण्याची त्याची इच्छा-ही दिसत नव्हती. स्वतः जवळ असलेल्या तोफांच्या जोरावर तो अजूनही जिद्दीने उभा होता. इतकेच नव्हे तर पुढेदेखील सरकत होता. 'एक दिवस आपण सिंगोरगडावर तोफा डागूच डागू,' अशी त्याची खात्री होती.

अन् झालेही तसेच! खरोखरच तो सिंगोरगडापासून अगदी जवळ असलेल्या पर्वताच्या पहाडीमध्ये येऊन उभा राहिला. त्याच्या तोफांची नळकांडी सिंगोरगडाच्या दिशेने तोंड करून उभी राहिलीं. छुप्या युद्धाचा आसरा घेणे आता महाराणीला अवघड जाऊ लागले,

तिने पाहिले सिंगोरगड चारही बाजूंनी शत्रूच्या सैन्याने वेढला गेला आहे. वखवखलेल्या मोंगल तोफा किल्ल्याच्या बुरूजावर नि तटावर चारही बाजूंनी सारख्या आग ओकीत आहेत. पण त्या आगीने किल्ल्याचे फारसे नुकसान झाले नाही. गडावर असलेली एकुलती एक तोफ खालच्या मोकळ्या मैदानाचे रक्षण करण्यात गुंतली होती. बाहेर पडण्यासाठी असलेल्या प्रवेशद्वाराजवळूनच ही तोफ आपले काम करीत होती. तिच्या समोर असलेल्या पर्वतराजीतून तोफेचे गोळे सोडणे शत्रूला शक्य नव्हते. साहजिकच त्या दिशेला असलेली शत्रूची सैन्यफळी कमकुवत होती. किल्ला दीर्घकाळपर्यंत लढवावा लागेल, अशा अपेक्षेने अगोदरच महाराणीने साधनसामुग्री भरून ठेविली होती. अन्न-पाणी, कशाचा म्हणून तिथे अभाव नव्हता. बाहेर जाऊन छुपा मारा करावा, असे महाराणीला राहून राहून वाटत होते. पण आठवडाभर तिने तसे काहीच केले नाही.

किल्ल्याला मोंगल सेनेचा घेरा पडून आता महिना होत आला. एवढ्या कालावधीत महंत गोपानंदाचे ते तीन शिष्य केवळ एकदाच किल्ल्यावर येऊन गेले, त्यांच्याकडून समजले की असफखानाची एक तुकडी भांडेरपर्यंत येऊन दाखल झाली आहे. त्यांच्याजवळ तोफा आहेत. काही दिवस तिथे मुक्काम करून ती गढ्याला रवाना होईल. जर महाराणीने ह्या तुकडीवर छापा घालावयाचे ठरविले तर फारच पंचाईत होईल. तसे झाले तर गडाच्या उत्तरेकडून मोंगली तोफा गडावर डागल्या जातील अन् मैदानात तिला चारही बाजूंनी घेरले जाईल. उरलेल्या तीनही बाजूला असलेले मोगल सैन्य असल्या संधीची वाटच पाहात आहे. ते पटकन् जोर करून गडाचा ताबा घेतील.'

खरे म्हणजे महंताच्या तीनही शिष्यांनी खरे ते सांगितले

नव्हतेच. असफखानाला त्यांनी जी माहिती दिली होती यापेक्षा खूपच वेगळी होती.

असफखानाला त्यांनी सांगितले होते. 'गढा-कटंगा' ह्या राज्याच्या आधीन असलेले राजे नि सरदार आपापल्या किल्ल्यांवर स्वत:ला बंद करून घेतील नि तिथूनच काय करायची ती लढाई करतील.पण त्यांचा फारसा जोर चालणार नाही.महाराणी हरली की ही मंडळी शस्त्रे खाली ठेवतील. थोडासा सामना होईल तो चौरागड नि गढा येथेच. सिंगोरगडाला वेढा पडलेला असताना महाराणी फार काळ तग धरू शकणार नाही. फार झाले तर दोन एक महिने तो किल्ला लढवील नि मग तिला बाहेर पडावेच लागेल. किल्ला सर करावयाचा असेल तर तो नदीच्या पश्चिमेकडून करावा लागेल. तो अधिक सोपा आहे. अन् महाराणीजवळ किल्ल्यावर केवळ पाच हजारच सैनिक आहेत....'

महंत गोपानंदाच्या तीन शिष्यांनी दिलेली माहिती महाराणीने शांतपणे ऐकून घेतली.

तिने म्हटले, 'तुम्ही म्हणता ते दक्षिणेकडले पहाड तसे इथून खूप दूर आहेत. तिकडून असफखानाची तुकडी गढ्याला गेलीच तर तिच्याशी सामना करावयास एकटे आमचे दिवाण आधारसिंहच पुरे आहेत. गढ्यालाच आहेत ते सध्या. त्यामुळे कसलीच भीती नाही. बाकीच्या तुमच्या माहितीत तसा फारसा दम दिसत नाही.'

'पश्चिमेकडल्या भांडेर पहाडीवर आपली किती सेना असेल, महाराणी ?' तिघांनी एकदम प्रश्न केला.

'असेल जवळ जवळ दोन एक हजार !'

महाराणीने उत्तर दिले अन् क्षणभर ती थांबली. तिने एकदा साऱ्यांकडे पाहिले. सारेजण गप्प गप्प बसून होते.

'तुम्ही म्हणता ती भांडेरची पहाडी नाही. कैमूरची आहे, असो होते अशी चूक कधी कधी. पण मला वाटते, आमचे सैन्य किती आहे, आमची ताकद किती आहे; ह्याची शत्रूने विचारपूस केलेली दिसते.' महाराणीने त्याच्या शिष्यांना प्रश्न केला.



'होय, महाराणीजी. इकडून तिकडून बरीच गोळा केलेली दिसते. आम्ही साधे-सरळ किसान बनून, जंगली किसान भासवून त्यांच्यात वावरत होतो. आमच्याचजवळ चवकशी केली तेव्हा आम्ही बळेच सांगून टाकिले—महाराणीजवळ लाखानी सैन्य आहे. दीड हजारावर हत्ती आहेत नि मजबूत अशा अगणित तोफा आहेत.'

माहिती ऐकता ऐकता दुर्गावती हसली.

तिने म्हटले, 'तुम्ही गडावरून चालू लागा. माहितगार माणसांनाच गडाच्या प्रवेशद्वारातून ठराविक वेळी सोडले जाते, हे

आता तुम्हाला चांगले ठाऊक आहे. तेव्हा कामाला लागा नि जाऊन मोंगली सेनेंच्या पश्चिमेकडल्या मोर्चाची माहिती काढून आणा, जा.'

महंत गोपानंद गप्प बसून हा सारा संवाद ऐकत होता. त्याच्या चेहऱ्यावरला उत्साह पडला होता.

त्याने महाराणीकडे पाहात भीतभीत म्हटलें, 'ह्या लोकांचे श्रम फुकट गेलेले दिसतात. ठीक आहे. तरीही महाराणीची आज्ञा आम्हाला मानलीच पाहिजे.'

महाराणीने म्हटले, 'ह्या मंडळींना जाऊ द्या. माझीं खात्री आहे, आता जातील ते चांगलीच खबर घेऊन येतील आमच्यासाठी. तसे नाही म्हटले तरी थोडीसी लाभदायक बातमी आणलीच आहे की त्यांनी नाही का ?'

महाराणीचा तो सवाल ऐकून त्या तिघा शिष्यांनी महंत गोपानंदाच्या दिशेने नजरा वळविल्या. थोडा वेळ कसलासा विचार करीत ते तसेच उभे राहिले.

'महाराणीचा ह्यापुढला कार्यक्रम काय असेल, हे जाणण्याची आमची फार इच्छा आहे. महाराणी कुठे बाहेर जाणार असतील तर आम्हाला त्यांचा ठावठिकाणा समजावा. म्हणजें काही बातमी हाताशी आलीच तर लगेच तिथे येऊन आम्ही ती महाराणीच्या कानांवर घालू.' तिघांपैकी एकाने प्रश्न केला.

महाराणी सावध होती. एकक्षण तिने महंत गोपानंदाकडे लक्षपूर्वक पाहिले. मग त्या तिघांकडे आपली नजर वळविली. अजूनही खाली माना घालून ते उभे होते.

'नाही. सध्या आम्ही कुठेच बाहेर जाणार नाही. इथेच किल्ल्यावर मुक्काम राहील आमचा. पण...पण तुम्ही किती

दिवसात परत फिराल तिकडून ?'

एकेका शब्दावर जोर देत महाराणी बोलत होती.

'महाराणीजी, काम फत्ते झाले तर दोनच दिवसात परतू नाहीतर कुणी सांगावे, जास्त वेळ देखील लागेल.'

'ठीक आहे. तुम्ही आजच निघा मग.' महाराणीने सूचना देत म्हटले.

महाराणी दुर्गावतीची आज्ञा शिरसावंद्य मानून ते तिघेही त्याच दिवशी आपल्यावर सोपविलेली कामगिरी पार पाडण्यासाठी म्हणून बाहेर पडले.

ते गेल्यावर मृदू स्वरात महाराणीने महंत गोपानंदाला म्हटले, 'महंतजी, आज आपण नेहमीपेक्षा काहीसे जास्तच विरक्त दिसता. असे काय घडलेय् एवढे ? तुम्ही इतके अवस्थ का ?'

महंत गोपानंद महाराणीच्या त्या प्रश्नांनी जरासा चमकला. पण आपली अवस्था महाराणीच्या लक्षात येऊ नये म्हणून त्याने प्रयत्न केला.

'काय झालेय् महाराणी, गुरुदेवांची काही दिवसांपूर्वी भेट झाली अन् तेव्हापासून मन सारखे इकडे-तिकडे भटकतेय्. अध्यात्माकडे ओढ लागलीय त्याची. बस्! इतकेच. तसा फारसा काही अवस्थ नाही मी.'

महंताने सफाईने खुलासा केला.

'मन लावून कर्तव्याचे पालन करणे, ही देखील एक योगसाधनाच नाही का ? महंतजी. तुम्हा योगी-महंतमंडळीकडूनच ऐकलेय् आम्ही कितीकदा तसे.' महाराणीने म्हटले.

'होय, महाराणी आम्हीही मनापासून आमच्या कर्तव्याचे पालन करू. अगदी जरूर करू. घाईघाईने महंताने महाराणीच्या

प्रश्नाला उत्तर दिले.

अन् तितक्याच घाईने तो आसनावरून उठला नि घाईगर्दीने पावले टाकीत आपल्या निवासस्थानाकडे निघून गेला.

संध्याकाळ उतरत असताना घोडेस्वारांची एक छोटीशी तुकडी घेऊन महाराणी दुर्गावती किल्ल्याबाहेर पडली. हत्तीवर बसून ती ह्या तुकडीचे नेतृत्व करीत होती. हत्तीची उंची भरपूर होती. त्याची गती किंचित जलद होती तरी माहुताचे त्यावर संपूर्ण नियंत्रण होते. तशात तिचा तो आवडता हत्ती होता. अन् त्या हत्तीचा माहुत गणूदेखील तिचा भक्तच होता!

किल्ला सोडून स्वारी थोडी दूर जाताच महाराणीचा एक गुप्तहेर धावत धावतच तिच्याजवळ आला अन् महाराणीने काही विचारण्यापूर्वीच त्याने आपल्याजवळची माहिती एका दमात देऊन टाकली.

त्याने म्हटले, 'महाराणीजी, मोगलांची एक तुकडी पायीच पाटणजवळील नदी उतरून आली असून तिचा गढा किंवा चौरा-गडाकडे जाण्याचा बेत दिसतोय.'

'ठीक आहे. आम्ही विचार करू त्याचा.'

महाराणीने उत्तर दिले तेव्हा. एकूण परिस्थितीचे चित्र तिच्या नजरेसमोरून सरकन् गेले. पाटणच्या किल्ल्यात तिची थोडीशी सेना होती. पण तिथे कसलीही सूचना पाठविणे आता तिला शक्य होणार नव्हते. अन् तरी देखील समजलेल्या माहितीच्या दृष्टीने हालचाल करणे तिला आवश्यक वाटत होते. तिने माहुताला हत्ती पाटण्याकडे नेण्याची सूचना दिली. सूचना मिळताच हत्ती पाटण्याच्या वाटेला लागला अन् मग मागून येणाऱ्या घोडेस्वारांना त्यांच वाटेने जाणे भाग पडले.


• •

## प्रकरण : ११

सूर्यास्त झाला ती तिच्या गुप्त हेराने तिची भेट घेतली. पाटण्याच्या त्या मोंगल सेनेबद्दल मिळालेली ताजी बातमी त्याने तिच्या कानांवर घातली. पाटण्यानजीकच्या जंगलात सारी रात्र काढून मग भल्या पहाटे गढ्याकडे कूच करण्याच्या सूचना त्या तुकडीला मिळाल्या होत्या. एक गड सर करण्याची कामगिरी त्या तुकडीवर सोपविली होती.

महाराणीला एवढे ऐकल्यावर स्वस्थ बसता येणे शक्य नव्हते. तिने आपले सैन्य पाटण्याजवळच्या त्या जंगलाकडे वळविले. अन् बघता बघता तिने त्या मोंगल तुकडीला घेरून टाकले. मोंगल तुकडी बेसावध होती. असे काही होईल असे तिच्या ध्यानीमनी-देखील नव्हते. बेसावध असलेल्या त्या तुकडीचा महाराणीने हा हा म्हणता फडशा पाडला.

अन् मगच महाराणी दुर्गावती सिंगोरगडाकडे मोठ्या दिमाखाने परत फिरली.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
बाल ... विभाग
क्र. क्र. ७८...
दिनांक ६/२/१२ ... १२१

# मनोरंजनाद्वारे सुसंस्कार म्हणजेच अरगडे कुलकर्णी प्रकाशने.

**आमचे लोकप्रिय संच**

(१) मनोरंजक व बोधप्रद गोष्टींच्या ३१ पुस्तकांचा संच
रु. १५–५०

(२) कुमारमाला संच – ले. दिवाकर बापट
(पाच कादंबरिका संच) रु. १५–००

(३) महानमानव संच
(उपपुस्तकांचा चरित्र संच) रु. २१–००

(४) संपूर्ण कथा रामायण – ले. वि. के. फडके
(भाग १ ते ६) रु. १८–००

(५) मनोरंजन माला (१ ते ९) रु. २०–००

(६) असे घडले छत्रपती
(चार पुस्तकांचा संच) रु. ६–००

BVBK-0400142